मेहता मराठी ग्रंथजगत

जानेवारी, २०२१
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष एकविसावे
अंक पहिला

बंदिस्त रंगमंचाच्या सुरक्षित अवकाशापल्याड रानामाळांत, उरसा-जत्रांत अभिनयाच्या श्रेष्ठ पताका झळकावणाऱ्या गावकुसाबाहेरील कलावंतांची श्रेष्ठ परंपरा मायमराठीत होती. त्या फिरत्या चाकावरच्या रंगफडात फुललेली **बेमिसाल प्रेमकहाणी!**

गाभूळलेल्या चंद्रबेनात

विश्वास पाटील



Book Available

सर्व वाचकांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

नवे पुस्तक

कर हर मैदान फ़तेह

विश्वास नांगरे पाटील

एकाच वेळी तीन स्पर्धा परीक्षा पार करणाऱ्या झुंजार अधिकाऱ्याचे प्रेरणादायी आणि न्यूनगंडाचा खात्मा करणारे आत्मकथन...

आपली प्रत आजच नोंदवा

वर प्री-बुकिंग उपलब्ध

किंमत : ₹२९९

२६ जानेवारी, २०२१ पासून वितरण

मेहता पब्लिशिंग हाऊस
मेहता बुक सेलर्स
www.mehtapublishinghouse.com

सर्व प्रमुख विक्रेत्यांकडे उपलब्ध

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जानेवारी २०२१ ◆ वर्ष एकविसावे ◆ अंक पहिला

संपादक
सुनील मेहता
कार्यकारी संपादक
शंकर सारडा
संपादन साहाय्य
योजना यादव
अंकाची किंमत १५ रु.
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.
प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस
मांडणी-अक्षरजुळणी
मेहता पब्लिशिंग हाऊस

अनुक्रमणिका

संपादकीय	४
पुरस्कार	१०
गौरव	१२
श्रद्धांजली	१४
विशेष लेख	१८
पुस्तक परिचय	
गुंतवणुकीची कामधेनू	३२
द मॅजिक ऑफ गेटिंग व्हॉट यू वॉन्ट	३६
आय हॅव अ ड्रीम	४०
रुक जाना नहीं...	४६
अभिप्राय	५५
दिनविशेष	६२

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

एक दिवा, एक आस आणि एक पुस्तक..

आयुष्यातलं एक वर्ष सरतं. अनामिक हुरहूर जाणवते. हातून काहीतरी निसटल्याची भावना बळावते; पण यंदा तसं वाटणार नाही. आपण एक विचित्र वर्ष अनुभवलं आहे. जे संपावं म्हणून प्रत्येकानं प्रार्थना केली आहे. म्हणूनच २०२१ची पहाट सुखद आहे. प्रसन्न आहे. नवी उमेद देणारी आहे. मागचं मळभ दूर सारणारी आहे. 'उद्याचं जगणं वेगळं असेल' ही आस जागवणारी आहे. अशा २०२१मध्ये तुम्हा सर्वांचं स्वागत.

जुनं वर्ष सरून नवं वर्ष सुरू होतं आणि आपण सरलेल्या दिवसांचा आढावा घेऊ लागतो; पण २०२१मध्ये पाऊल टाकल्यावर आपल्याला कदाचितच मागे वळून पाहावंसं वाटेल.

सबंध जगानं घेतलेला तो मोठा पॉज, सहा फुटांचं अंतर पाळता पाळता, आयुष्यभराचं अंतर देऊन गेलेली आपली माणसं, त्यांना दहा फुटावरूनच दिलेला निरोप, स्मशानवाटेवरच्या रांगा, मास्कमध्ये घुसमटणारा श्वास, चौदा आकड्याला आलेला नवा आयाम.

हे सगळं आपल्याला विसरायचं आहे आणि ते विस्मरणही सेलिब्रेट करायचं आहे. खरंच २०२० संपलंय. आयुष्याची अद्दल घडवून संपलंय. जे आहे ते जपणं किती महत्त्वाचं आहे, याची जाणीव देऊन संपलंय. भविष्याला गृहीत धरण्यातले धोके दाखवून संपलंय. म्हणून २०२१कडे आपण आशादायी नजरेने पाहतो आहोत.

मागचं वर्ष अनेक अर्थांनी त्रासाचं ठरलं असलं तरी या वर्षात काही रचनात्मक, सकारात्मक गोष्टीही घडल्या. याच वर्षाच्या सुरुवातीला आम्ही ज्येष्ठ लेखक श्री.विश्वास पाटील यांची 'गाभुळलेल्या चंद्रबनात' ही विलक्षण कादंबरी प्रकाशित केली. टाळेबंदीच्या दिवसांतही लोकांनी या कादंबरीस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. एका निखळ प्रेमाची गोष्ट सांगता सांगता महाराष्ट्रातील समृद्ध लोकपरंपरेचा वारसा या कादंबरीच्या निमित्ताने जपला गेला. कादंबरीच्या नावाप्रमाणेच ही कादंबरी पुढेही असाच रंगतदार प्रवास करेल, याची आम्हाला खात्री आहे.

तर नव्या वर्षात आम्ही श्री.विश्वास नांगरे पाटील यांचं 'कर हर मैदान फतेह' हे प्रेरणादायी आत्मकथन वाचकांच्या भेटीस घेऊन येत आहोत. कोरोनाच्या लसीची जशी जगभरातील लोकांना प्रतीक्षा आहे, तशीच वाचकांना या पुस्तकाची प्रतीक्षा असल्याचा अनुभव या पुस्तकाच्या प्री-बुकिंगच्या निमित्ताने आला. आणि वर्ष सरता सरता कोरोनाने पुस्तक विक्रीवर आणलेली मगरळ झटकली गेली असल्याचा अनुभव आला.

मागच्या वर्षात पुस्तकांच्या दुकानांतील बंद कपाटांमध्ये पुस्तकांनी महिनोन् महिने वाचकांची वाट पाहिली. आता त्या पावलांची पुन्हा नव्याने चाहूल लागली आहे. येणारं वर्ष या साऱ्या अपेक्षांवर पुरेपूर उतरावं, ही आस बाळगू. वाचत राहू आणि शायर इफ्तिखार आरिफ म्हणतात तसं एक दिवा, एक आस आणि एका पुस्तकाचं धन जोपासत राहू.

एक चराग़ और एक किताब और एक उम्मीद असासा
उस के बाद तो जो कुछ है वो सब अफ़्साना है

नव्या वर्षाच्या उदंड शुभेच्छा!!!

मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

अधिक माहितीसाठी संपर्क

wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

मेहता पब्लिशिंग हाऊस

amazon | GET IT ON Google Play | Get it on Apple Books

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

eBooks

www.amazon.in

play.google.com

https://books.apple.com

Online पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

हा सेंकद
हा मिनिट
हा तास...
या क्षणाचे सारे रिवाज.

इथून पुढे नवी आस
इथून पुढे नवा साज.

या क्षणी
या मनी
चेतवू नवा राग.

नव्या वर्षाच्या उदंड शुभेच्छा !

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या दोन पुस्तकांना अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचे पुरस्कार जाहीर

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघामार्फत दिला जाणारा साल २०१९चा विज्ञानविषयक साहित्यातील प्रथम पुरस्कार अतुल कहाते लिखित 'अंतराळ स्पर्धा' पुस्तकास, तर मुखपृष्ठासाठीचा (बालसाहित्य) उत्तेजनार्थ पुरस्कार ज्ञानदा नाईक लिखित 'चेटकिणीशी गट्टी जमली' (मुखपृष्ठ : घनश्याम देशमुख) पुस्तकास लाभला आहे. जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून येत्या २३ एप्रिलचे सुमारास वर्ष २०१९ व वर्ष २०२० या दोन्ही वर्षांचे पुरस्कार एकत्रित प्रदान करण्याचा संघाचा विचार आहे.

सुधा मूर्ती यांना २१वा लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय उत्कृष्टता पुरस्कार

सुधा मूर्ती म्हणजे समर्पण आणि लोकसेवेचं प्रतीक. त्यांच्या सामाजिक सेवेचा यथोचित सन्मान करत केंद्र सरकारतर्फे त्यांना २१व्या लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय उत्कृष्टता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. २१ नोव्हेंबर रोजी उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांच्या उपस्थितीत एका व्हर्च्युअल कार्यक्रमात सुधा मूर्ती यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार प्रदान करतेवेळी श्री. नायडू यांनी सुधा मूर्ती यांचं कार्य देशसेवेत मोलाची भूमिका बजावणारं असल्याचं सांगितलं.

नवी संहिता... नवा आशय...

तरुणाईची मानसिकता, मोकळ्या अवकाशातलं स्वातंत्र्य आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या आव्हानांचा सुरस मेळ असणारी बाबाराव मुसळे यांची नवी कादंबरी

नो नॉट नेव्हर

लेखक
बाबाराव मुसळे

किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध

गौरव एका शिक्षकाचा...

महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक रणजितसिंह डिसले यांना जागतिक स्तरावरील मानाचा असा 'ग्लोबल टीचर प्राइझ' हा पुरस्कार जाहीर झाला. युनेस्को व लंडनस्थित वार्की फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा 'ग्लोबल टीचर प्राइज' असा पुरस्कार मिळणारे रणजितसिंह पहिलेच भारतीय शिक्षक ठरले आहेत. या पुरस्काराची रक्कम एक मिलियन अमेरिकन डॉलर्स म्हणजे सात कोटी रुपयांहून अधिक आहे. जगातील १४० देशांतील १२ हजारांपेक्षा अधिक शिक्षकांमधून त्यांची निवड झाली.

शिक्षक म्हणून आपल्यासोबतच्या इतर शिक्षकांना अधिक गुणवत्तापूर्ण काम कसे करता येईल आणि त्याचबरोबर विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण शिक्षण कसे देता येईल, या दोन प्रमुख गोष्टींवर आगामी काळात काम करण्याचे ठरवले आहे. शिक्षकांना बदलत्या काळानुसार चांगले प्रशिक्षण मिळण्यासोबतच, नावीन्यपूर्ण बाबींची माहिती होण्यासाठी 'टीचर इनोव्हेशन फंड'ची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यात

पुरस्काराची काही रक्कम देणार आहे. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील ज्ञान देण्यासोबतच 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल' या उद्दिष्टानुसार प्रशिक्षित करण्याचे ठरविले आहे. विद्यार्थ्यांमार्फत जगात शांततेचा प्रसार व प्रचार करण्यासाठी 'पीस आर्मी'ची निर्मिती करण्याचे ठरवले आहे.

शिक्षक विद्यार्थ्यांना शिक्षित करून त्यांच्यामार्फत देशाचे भविष्य घडवतात. शिक्षण क्षेत्रात काम करण्याची अजूनही भरपूर संधी आहे. त्यामुळे युवावर्गाने उत्तम शिक्षक म्हणून आपले करिअर घडवण्यासाठी समोर आले पाहिजे. शिक्षण क्षेत्रात भरपूर काम करणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत सध्या जे विद्यार्थी आहेत, त्यांनी या पेशात येण्याचे ठरवून उत्तम शिक्षक होण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, असे विचार रणजितसिंह डिसले यांनी मांडले.

चिरंतन यशाचा मार्ग

जर योग्य मानसिक दृष्टिकोन असेल तर अंतिम साध्य गाठण्यास, यशस्वी होण्यास माणसाला कोणीही अडवूच शकणार नाही. तो यश मिळवणारच; पण मानसिक दृष्टिकोनच जर चुकीचा असेल तर त्याला कोणी यश मिळवूनही देऊ शकणार नाही हे निश्चित!

– थॉमस जेफर्सन,
अमेरिकेचे तिसरे राष्ट्राध्यक्ष

किंमत : ६०/-रु.

A Gift Book



अशोक याळगी

पत्रकार अशोक याळगी यांचे निधन झाले. पत्रकार म्हणून कार्यरत असताना 'सर्चलाईट' या विशेष सदरातून त्यांनी अनेक प्रश्नांना व अन्यायांना वाचा फोडली. लोकमान्य ग्रंथालयाचे कार्याध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

बेळगावच्या सांस्कृतिक साहित्यिक क्षेत्रात अलीकडच्या काळात याळगी यांनी बरेच काम केले. लोकमान्य ग्रंथालयाचा लक्षणीय विस्तार करत त्यांनी अनेक मान्यवरांची स्मृतिदालने सुरू केली. 'संस्कारक्षम पुस्तके', 'अल्पदरात-घराघरात' असे उपक्रम राबविले.

सुनीता दांडेकर

मेहता मराठी ग्रंथजगतच्या माजी सह संपादक सुनीता दांडेकर यांचे निधन झाले. त्यांनी जवळ जवळ दहा-अकरा वर्षे मेहता मराठी ग्रंथजगतचे काम पाहिले.

मंगलेश डबराल

प्रसिद्ध कवि मंगलेश डबराल यांनी ९ डिसेंबर रोजी संध्याकाळी शेवटचा श्वास घेतला. पण साहित्य अकादमी विजेत्या या कवीचे बोल चिरंतन राहतील.

मंगलेश डबराल यांच्या स्मृती जागवणाऱ्या या त्यांच्याच ओळी...

पहले भी शायद मैं थोड़ा-थोड़ा मरता था
बचपन से ही धीरे-धीरे जीता और मरता था
जीवित बचे रहने की अन्तहीन खोज ही था जीवन
जब मुझे जलाकर पूरा मार दिया गया
तब तक मुझे आग के ऐसे इस्तेमाल के बारे में पता भी नहीं था
मैं तो रँगता था कपड़े ताने-बाने रेशे-रेशे
चौराहों पर सजे आदमक़द से भी ऊँचे फ़िल्मी क़द
मरम्मत करता था टूटी-फूटी चीज़ों की
गढ़ता था लकड़ी के रँगीन हिण्डोले और गरबा के डाण्डिये
अल्युमिनियम के तारों से छोटी-छोटी साइकिलें बनाता बच्चों के लिए
इस के बदले मुझे मिल जाती थी एक जोड़ी चप्पल, एक तहमद
दिन भर उसे पहनता, रात को ओढ़ लेता
आधा अपनी औरत को देता हुआ।

मेरी औरत मुझसे पहले ही जला दी गई
वह मुझे बचाने के लिए खड़ी थी मेरे आगे
और मेरे बच्चों का मारा जाना तो पता ही नहीं चला
वे इतने छोटे थे उनकी कोई चीख़ भी सुनाई नहीं दी
मेरे हाथों में जो हुनर था, पता नहीं उसका क्या हुआ
मेरे हाथों का ही पता नहीं क्या हुआ
उनमें जो जीवन था, जो हरकत थी, वही थी उनकी कला
और मुझे इस तरह मारा गया
जैसे मारे जा रहे हों एक साथ बहुत से दूसरे लोग

मेरे जीवित होने का कोई बड़ा मक़सद नहीं था
और मुझे मारा गया इस तरह जैसे मुझे मारना कोई बड़ा मक़सद हो।

और जब मुझसे पूछा गया - तुम कौन हो
क्या छिपाए हो अपने भीतर एक दुश्मन का नाम
कोई मज़हब कोई तावीज़
मैं कुछ नहीं कह पाया मेरे भीतर कुछ नहीं था
सिर्फ़ एक रँगरेज़, एक कारीगर, एक मिस्त्री, एक कलाकार, एक मजूर था
जब मैं अपने भीतर मरम्मत कर रहा था किसी टूटी हुई चीज़ की
जब मेरे भीतर दौड़ रहे थे अल्युमिनियम के तारों की साइकिल के
नन्हे पहिए
तभी मुझपर गिरी आग, बरसे पत्थर
और जब मैंने आख़िरी इबादत में अपने हाथ फैलाए
तब तक मुझे पता नहीं था बन्दगी का कोई जवाब नहीं आता।

अब जबकि मैं मारा जा चुका हूँ, मिल चुका हूँ
मृतकों की मनुष्यता में, मनुष्यों से भी ज़्यादा सच्ची ज़्यादा स्पन्दित
तुम्हारी जीवित बर्बर दुनिया में न लौटने के लिए
मुझे और मत मारो और न जलाओ, न कहने के लिए
अब जबकि मैं महज़ एक मनुष्याकार हूँ, एक मिटा हुआ चेहरा, एक
मरा हुआ नाम
तुम जो कुछ हैरत और कुछ खौफ़ से देखते हो मेरी ओर
क्या पहचानने की कोशिश करते हो
क्या तुम मुझमें अपने किसी स्वजन को खोजते हो
किसी मित्र परिचित को या ख़ुद अपने को
अपने चहरे में लौटते देखते हो किसी चहरे को।

अलविदा मंगलेश डबराल....

नवी संहिता... नवा आशय...

कनेक्ट द डॉट्स

...उद्योजकांच्या यशोगाथा



रश्मी बन्सल। अनुवाद : **आरती कदम**

'कनेक्ट द डॉट्स' म्हणजे एमबीएची पदवी नसतानाही ज्यांनी स्वत:चे व्यवसाय स्वबळावर उभे केले, अशा वीस उद्योजकांच्या प्रेरणादायी कहाण्या. स्वत:ला सिद्ध करण्याची इच्छाच त्यांना प्रेरक ठरली, त्यातूनच त्यांना लाभलं त्यांच्या आवडीचं, ध्यास लावणारं एक अर्थपूर्ण जगणं! या साऱ्यांच्या कथा एक गोष्ट ठळकपणे अधोरेखित करतात, ती म्हणजे मोठी स्वप्नं पाहण्यासाठी आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी उच्च पदवी किंवा पिढीजात श्रीमंतीच असायला हवी असं काही नाही. ते सारं काही असतं तुमच्या मनात, डोक्यात आणि हातात.

किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध



यश संपादन करताना काय काय गोष्टी तुम्ही गमावून बसलात, काय काय गोष्टी तुम्हाला सोडून द्याव्या लागल्या, याचा विचार करा आणि त्यावरच यशाचं मोजमाप करा.

– दलाई लामा, तिबेटी धर्मगुरू

आधुनिक मराठी गद्याचा आद्य शिल्पकार

– शरद गोगटे

पेशवाईच्या अखेरीपर्यंत मराठीत जी साहित्य- निर्मिती झाली ती मुख्यतः पद्य स्वरूपाचीच होती. सरदार घराण्यांच्या बखरी व पत्रव्यवहार हे सर्व गद्य स्वरूपात लिहिले जात असले तरी ते सहसा अत्यंत मर्यादित वाचकांसाठीच असे. ज्ञानेश्वर-मुकुन्दराज यांच्यापासून ते मोरोपंतांपर्यंत अनेक संत आणि पंत कवींनी लिहिलेले बहुतेक सर्व साहित्य हे भक्ती व परमार्थपर आहे. हे सर्व साहित्य समाजात काही प्रमाणात हस्तलिखित नकलांद्वारे; पण मुख्यतः मौखिक माध्यमातून प्रसृत झालं होतं. याच्या जोडीला त्या काळाच्या उत्तरार्धात शाहिरांनी केलेली कवने ही सर्वसामान्य जनांच्या मनोरंजनासाठी लिहिलेली शृंगारिक आणि वीररसपूर्ण अशी होती. सामान्यतः त्या काळात स्वतंत्र गद्य ग्रंथ (वैचारिक वा मनोविनोदात्मक) निर्मिती झाली नाही असं म्हणणं फारसं चुकीचं होणार नाही. या काळात गद्य ग्रंथ लिहिले न जाण्याला इतरही

कारणं असतील; परंतु त्या काळात मराठी ही ज्ञानभाषा वा अभ्यासभाषा म्हणून ओळखली जात नव्हती, हे एक महत्त्वाचं कारण होतं. मराठी ही ज्ञानभाषा व अभ्यासभाषा नसल्यामुळे या भाषेची व्याकरणं लिहिली गेलेली दिसत नाहीत. मराठी शुद्ध व शिस्तबद्ध लिहिली गेली पाहिजे यासाठी कोणी आग्रही होतं असं दिसत नाही. जे काही गद्य लिहिले जाई ते पुष्कळदा मोडी लिपीत. ही लिपी मुख्यतः शीघ्र लेखनासाठी वापरली जात असे. साहजिकच या लिपीतील लेखनात शक्यतो लेखणी न उचलता सलग जोडून लिहिण्याच्या सोयीला महत्त्व होतं. त्यामुळे योग्य ते ऱ्हस्व-दीर्घाबाबतचे नियम पाळले जात नसत. लिहिणाऱ्यांना व वाचणाऱ्यांनाही त्यात काही वावगं वा चुकीचं वाटत नसे. या परिस्थितीत जेव्हा एल्फिस्टन वगैरे मंडळींनी मराठी माध्यमातून यत्तावार शिक्षण द्यायचे धोरण अवलंबले तेव्हा शालोपयोगी पुस्तकांची वानवा ही एक मोठी अडचण आहे, हे त्यांच्या लक्षात आलं. द. वा. पोतदारांनी नमूद केल्या- प्रमाणे 'गणितादि शास्त्रे' किंवा 'व्याकरणकोश' यांसारखी पुस्तकेसुद्धा मराठीत नाहीत, तेव्हा संन्याशाच्या मुंजीला शेंडीपासून तयारी पाहिजे यासाठी खटपट सुरू झाली.'

श्री. अनिल मेहता यांनी त्यांच्या महाबळेश्वर भेटीदरम्यान 'थॉमस कॅन्डी' यांच्या समाधीचा शोध घेतला आणि हे दुर्लक्षित समाधीस्थळ चर्चेत आलं.

एलफिस्टनच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या 'दि बॉम्बे नेटिव्ह स्कूल ॲन्ड स्कूल बुक सोसायटी' मार्फत या खटपटीला सुरुवात झाली. या सोसायटीने प्रारंभी जार्सिस यांची मराठीतून लिहिलेली गणिताची पुस्तकं काढली. त्या सोसायटीकडे कामाला ठेवलेल्या चार शास्त्र्यांपैकी

जगन्नाथशास्त्री, गंगाधरशास्त्री व बाळशास्त्री या तिघांना मराठी भाषेचे व्याकरण रचण्याची आज्ञा केली गेली. त्यांनी वर्षभरात 'संस्कृत व्याकरणाध्यायन बलें करून' मराठीचे व्याकरण तयार केले. या व्याकरणाच्या हस्तलिखित प्रतीच स्कूल बुक सोसायटीच्या शाळांतील विद्यार्थी सुमारे दहा-बारा वर्षं म्हणजे १८३५-३६ पर्यंत वापरत होते. हे पुस्तक प्रत्यक्षात कधीच छापलं गेलेलं दिसत नाही. हे हस्तलिखित व्याकरण तयार होण्याच्या सुमारासच मुंबईहून महमद इब्राहिम मखबा यांचं 'अ ग्रामर ऑफ द महरट्टा लॅंग्वेज' हे प्रसिद्ध झालं. त्याही आधी कलकत्त्याजवळील श्रीरामपूर येथून विल्यम कॅरेचे 'मराठीचे व्याकरण' १८०५मध्ये प्रकाशित झाले होते; परंतु ते मुंबईत व महाराष्ट्रात सहज उपलब्ध नव्हते. त्या काळात युरोपिअन मुलकी व सैनिकी अधिकाऱ्यांना मराठी भाषेची परीक्षा द्यावी लागत असे. ती अत्यावश्यक झाली नसली तरी ती नोकरीतील वाटचालीला उपयोगी ठरत असे. त्यामुळे खाजगीरीत्या काही मराठी व्याकरणं प्रसिद्ध झालेली दिसतात. दि बॉम्बे नेटिव्ह स्कूल ॲन्ड स्कूल बुक सोसायटीच्या शाळा सुरू झाल्यानंतरही खाजगीरीत्या गंगाधरशास्त्री फडके, बाळशास्त्री जांभेकर इत्यादींनी मराठीची व्याकरणं प्रसिद्ध केलेली दिसतात. 'मराठीचे पाणिनी' असं ज्यांना संबोधलं जातं त्या दादोबा पांडुरंग यांचं 'मराठी भाषेचें व्याकरण'ही १८३६मध्ये प्रकाशित झालं. त्यांच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेतील पुढील उताऱ्यावरून त्या काळात मराठी गद्य लेखनाला आवश्यक तो व्याकरणाचा आधार कसा नव्हता याची कल्पना येते :

प्रथमतः जो कोणी व्याकरण ग्रंथ या भाषेत करावयास बसेल, त्यास मुळी याचे नियम बांधावयास कोणताही आधार नाहीं; सर्व जें कांही तो करील तें नवें, व त्याची कल्पना तोच त्याचा आधार; दुसरें, या भाषेंत आंतून गोंधळ किती आहे तो अंमळ विचार केल्यावर लागलाच ध्यानांत येतो; त्या सर्वांचे पृथक् पृथक् नियम बांधणें हे काम बोलताना सुलभ वाटतें; परंतु तें करावयास गेल्यावर किती अवघड आहे याचा अनुभव यावयास उशीर लागणार नाही. या परिस्थितीत थॉमस कॅन्डी याने जवळ जवळ पन्नास वर्षं सातत्याने मराठीची प्रमाण लेखन पद्धती प्रस्थापित करण्यासाठी विविध अंगांनी जे प्रयत्न केले ते मुद्दाम लक्षात घ्यावेत असे आहेत.

थॉमस कॅन्डी हा वयाच्या सोळाव्या वर्षी, साधारणतः इ.स. १८२०

अखेरी बॉम्बे आर्मीत दाखल होऊन मुंबईस आला. हिंदुस्तानीची परीक्षा चांगल्या रीतीने उत्तीर्ण झाल्यामुळे त्याची सोलापूर येथे दहाव्या नेटिव्ह इन्फंट्रीच्या दुसऱ्या बटॅलिअनमध्ये क्वार्टरमास्टर व दुभाष्या म्हणून नेमणूक झाली. त्या वेळी 'मोल्सवर्थकृत मराठी-इंग्रजी शब्दकोश' या ग्रंथाचा कर्ता जेम्स थॉमस मोल्सवर्थही सोलापूरला आर्मीच्या कॉमिसारिएट विभागात होता. त्या वेळी तो भाषांतरास उपयोगी अशा मराठी शब्दांचा संग्रह करत होता. 'समानशीले व्यसनेषु सख्यम्' या उक्तीप्रमाणे कॅन्डी मराठी शब्दसंग्रह करण्यात मोल्सवर्थला मदत करू लागला. पुढे कॅन्डीने मराठीची परीक्षा दिली. आता त्याची मराठीसाठीही दुभाष्या म्हणून नेमणूक झाली. मध्यंतरात मोल्सवर्थने एक अत्यंत महत्त्वाकांक्षी अशी 'मराठी-इंग्रजी व इंग्रजी-मराठी शब्दकोशा'ची योजना मुंबई सरकारकडे सादर केली. त्याने या शब्दकोशाच्या पहिल्या भागावर- मराठी-इंग्रजी शब्दकोशावर- काम सुरू केल्यावर त्याने 'कॅन्डीला त्याच्या मदतीला द्यावे' अशी विनंती सरकारला केली आणि ती सरकारने मान्य केली. त्यामुळे कॅन्डीला सैन्यातून तात्पुरते मोकळे करण्यात आले. मोल्सवर्थ बरोबर शब्दकोशाचे काम करत असताना कॅन्डीची मराठी जाण वाढत गेली.

पुढे मोल्सवर्थच्या महत्त्वाकांक्षी शब्दकोश योजनेच्या दुसऱ्या भागाचं - इंग्रजी-मराठी शब्दकोशाचं - काम सुरू झाल्यावर मोल्सवर्थने या कामातही कॅन्डीला आपल्या मदतीला घेतलं. ही गोष्ट १८३२ मधली. हे काम सुरू झाल्यानंतर प्रकृती बिघडल्यामुळे मोल्सवर्थ इंग्लंडला परत गेला. जाताना तो, तोपर्यंत झालेल्या कामाचे कागद बरोबर घेऊन गेला. इंग्लंडमध्ये काम पुरं करण्याचा त्याचा विचार होता.

मोल्सवर्थ परत गेल्यानंतर कॅन्डीवर कंपनी सरकारच्या 'रेग्युलेशन्स'च्या मराठी भाषांतरातील चुका दुरुस्त करण्याचं काम देण्यात आलं. हे काम चांगल्या प्रकारे केल्यामुळे, एल्फिस्टनने पुण्याला स्थापन केलेल्या हिंदु कॉलेजचा व दक्षिणेतल्या सरकारी शाळांचा सुपरिंटेन्डन्ट म्हणून त्याची नेमणूक झाली. येथून त्याच्या स्वतंत्र कर्तृत्वाची सुरुवात झाली.

मध्यंतरात मोल्सवर्थने शब्दकोशाचे काम इंग्लंडमध्ये होऊ शकत नाही म्हणून बरोबर नेलेले सर्व बाड हिंदुस्तानात परत पाठवले. १८४० साली कॅन्डीला, त्याच्यावर असलेल्या हिंदु कॉलेज वगैरे जबाबदाऱ्यांच्या जोडीला

हा कोश पूर्ण करण्याची जबादारीही देण्यात आली. कॅन्डीने सात वर्षं खपून हे काम पूर्ण केलं आणि १८४७ साली हा कोश प्रकाशित झाला. हा शब्दकोश पुरा होत असतानाच मोल्सवर्थच्या मराठी-इंग्रजी कोशाची नवी आवृत्ती करण्याची गरज भासू लागली. त्यासाठी कॅन्डीच्या सूचनेनुसार सरकारने मोल्सवर्थला इंग्लंडहून हिंदुस्तानात बोलावले. त्याप्रमाणे मोल्सवर्थ १८५० साली मुंबईला आला. पुढे सात वर्षं या दुसऱ्या आवृत्तीचं काम चालू होतं. या दुसऱ्या आवृत्तीच्या कामातही कॅन्डीने मोल्सवर्थला मदत केली.

हिंदु कॉलेजचा मुख्याध्यापक व दक्षिणेतल्या सरकारी शाळांचा सुपरिंटेन्डन्ट म्हणून काम बघत असताना, मराठीत क्रमिक पुस्तकं नसल्यामुळे आवश्यकतेनुसार क्रमिक पुस्तकं लिहिणं वा इतरांकडून लिहून घेणं, जरूर ती पुस्तकं इंग्रजीतून स्वतः भाषांतर करणं, काहींची पंडितांकडून भाषांतरं करून घेऊन ती तपासून शुद्ध करणं, संपलेल्या पुस्तकांच्या नव्या सुधारित आवृत्त्या काढणं ही सर्व कामं तो करत होता. एका अर्थाने हा त्याच्या ग्रंथ-संपादकीय कार्याचा प्रारंभ होता.

इंग्रजी-मराठी शब्दकोशाचे काम संपता संपता १८४७ साली बॉम्बे गव्हर्नमेन्टने त्याची मराठी ट्रान्सलेटर ॲन्ड रेफरी म्हणून नेमणूक केली. त्या वेळी सरकारी शिक्षण खात्याकडून विद्यार्थ्यांसाठी क्रमिक पुस्तकं तयार करून घेण्याचं काम चालू होतंच. त्याच्या जोडीला 'दक्षिणा प्राइझ कमिटी' कडे आलेली हस्तलिखितं तपासून त्यातील प्रकाशनयोग्य पुस्तकं निवडून त्यांवर संस्करण करून घेणं हे कामही 'रेफरी' म्हणून कॅन्डीला करावं लागत होतं. पेशव्यांच्या कारकिर्दीत विद्वानांना व होतकरू पाठकांना दक्षिणा देण्यासाठी जो निधी वापरला जात होता, त्या निधीचाच उपयोग 'हिंदु कॉलेज' स्थापन करण्यासाठी झाला होता. हा सर्व निधी केवळ पारंपरिक संस्कृत अध्ययनासाठी वापरण्यापेक्षा पाश्चात्त्य नवे विचार मराठीतून लोकांना उपलब्ध करून देण्यासाठीही व्हावा यासाठी लोकहितवादींच्या प्रयत्नामुळे सरकारने 'दक्षिणा प्राइझ कमिटी' स्थापन केली होती. प्रारंभी फक्त इंग्लिशमधील चांगल्या ग्रंथांच्या मराठी भाषांतराचाच विचार ही कमिटी करत असे. पुढे मूळ मराठी ग्रंथांचा विचारही ही कमिटी करू लागली.

साधारण याच सुमारास कर्नल फ्रेंच व कॅप्टन हार्ट या दोन अधिकाऱ्यांच्या पुढाकाराने 'डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी'

नावाची संस्था स्थापन झाली. या संस्थेमार्फतही निवडक इंग्लिश ग्रंथांची भाषांतरं करून घेतली जाणार होती. ही सर्व भाषांतरं तपासण्याचं कामही कॅन्डीलाच करावं लागत होतं.

वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यावेळी मराठी शुद्धलेखन पद्धती अद्याप निश्चित झालेली नव्हती. मुळात मराठी लिहिण्यासाठी मोडी लिपीचा वापर सर्रास होत होता आणि त्यामुळे लिहिताना ऱ्हस्व-दीर्घाचा विचार करण्याची सवयच नव्हती. त्यातही वेगवेगळ्या पंडितांची वेगवेगळी मते होती. (शुद्धलेखन नियमांबाबत आजही सर्व विद्वानांच्यात एकमत नाही.) अशा परिस्थितीत कॅन्डीला, तपासून दुरुस्त करायच्या पुस्तकांतील लेखनपद्धतीत सुसूत्रता राखण्यासाठी काहीतरी धोरण ठरवणं आवश्यक होतं. इंग्लिश-मराठी शब्दकोशाचं काम करत असतानाच त्यानं त्याचं शुद्धलेखनविषयक धोरण निश्चित केलं होतं आणि तेच त्याने खंबीरपणे आमलात आणलं. त्याने अनेक पुस्तकांची परीक्षणं केली आणि त्यात शुद्धलेखनाच्या व इतर सुधारणा सुचवल्या. त्याने सुचवलेल्या सुधारणा करून घेण्याबाबत तो विशेष दक्ष होता. मराठी गद्य लेखनात सुसूत्रता व शिस्त आणण्याच्या दृष्टीने त्याने आणखी एक महत्त्वाची गोष्ट केली ती म्हणजे मराठीत विरामचिन्हांचा वापर सुरू केला. काही इंग्लिश वाचू लागलेले सुशिक्षित मराठी लेखनात 'पन्क्च्युएशन मार्क्स' वापरण्याचे प्रयोग करू लागले होते; परंतु ते काहीशा चुकीच्या पद्धतीने वापरत आहेत, हे कॅन्डीच्या लक्षात आल्यावर त्याने 'पन्क्च्युएशन मार्क'साठी 'विरामचिन्ह' हा अतिशय अन्वयार्थक मराठी शब्द योजून 'विरामचिन्हांची परिभाषा' ही एक मार्गदर्शक पुस्तिका लिहिली. पूर्णविराम, अर्धविराम, स्वल्पविराम, प्रश्नार्थक चिन्ह इत्यादी सर्व चिन्ह-नामे ही कॅन्डीचीच देणगी आहे. त्याचे संपादक म्हणून एक वैशिष्ट्य मुद्दाम नमूद केलं पाहिजे की तो दुरुस्त्यांबाबत आग्रही व दक्ष असला तरी कोणत्याही प्रकारे लेखक दुखावला जाणार नाही याची तो काळजी घेत असे. या संदर्भात त्या काळातले एक बहुप्रसव लेखक, 'बालबोध'कार विनायक कोंडदेव ओक यांचा कॅन्डीबद्दलचा पुढील अभिप्राय लक्षात घ्यावा असा आहे:

त्यांचे एक मोठे धोरण असे कीं, कोणाही लेखकाची हिम्मत खचू द्यायची नाही. चुका दाखवायच्या, ग्रंथ शुद्ध करायचा, आणि ज्या रीतीने त्या

सुधारण्यास ग्रंथकारास सुचवायचे, ते इतके जपून करावयाचे कीं पुस्तकं 'वाईट' असे कधी सहसा म्हणावयाचे नाही. तितकाच प्रसंग आला तर 'चांगले नाही' म्हणायचे. दुखवायचे नाही. हातपाय मोडायचे नाहीत.

शालेय पुस्तकं लिहिण्याचं आणि दुरुस्त करण्याचं काम तो, त्याची 'हिंदु कॉलेज' आणि दक्षिणेतल्या सरकारी शाळांचा सुपरिंटेन्डन्ट म्हणून नेमणूक झाल्यापासून करतच होता. ट्रान्सलेटर व रेफरी म्हणून नेमणूक झाल्यानंतर तो प्रौढांसाठी तयार होणाऱ्या पुस्तकांची हस्तलिखिते/छापील पुस्तके तपासण्याचं कामही करू लागला. हे काम तो जवळ जवळ १८७६ अखेर पर्यंत त्याच्या मृत्यूच्या केवळ तीन-चार महिने आधीपर्यंत करत होता. या काळात प्रकाशित झालेली बहुतेक सर्व पुस्तकं कॅन्डीच्या नजरे- खालून गेली होती, असं म्हणणं चुकीचं ठरणार नाही. प्रा. कृ. भि. कुलकर्णींनी 'आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति' या ग्रंथात नमूद केल्याप्रमाणे मेजर कॅन्डी यांनी पाहिल्याशिवाय मराठी भाषेंत लिहिलेले कोणतेही पुस्तक, मग ते शालेय असो अगर प्रौढ लोकांसाठी लिहिलेले असो, छापावयाचें नाहीं असा दंडकच होता, असें म्हणावयास हरकत नाही. त्यामुळें ते हयात असेपर्यंत छापली गेलेली मासिकें, नाटकें, कादंबऱ्या इत्यादिकांची भाषा त्यांच्या कल्पनेशी जुळणारी असली तरच त्यांच्या कर्त्यांना सरकारी उत्तेजन व विद्याखात्याकडून आर्थिक मदत होत असे.

याचा अर्थ त्याच्या निरंकुश सत्तेला विरोध झालाच नाही असं नाही. 'प्रभाकर'कर्ते भाऊ महाजन यांच्याशी त्याचे अटीतटीचे वाद झाले, त्याचप्रमाणे दादोबा पांडुरंग, रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांच्याशी मतभेद झाले. त्या काळातील एक तडफदार डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन हॉवर्ड, रे.मिचेल, रे.स्टीव्हनसन इत्यादी मराठीच्या युरोपिअन जाणकारांशी त्याला चर्चा करावी लागली. यातून मार्ग काढत निष्ठेने आणि भक्कमपणे त्याने मराठी गद्य लेखनाला चालना दिली; त्यात शिस्त आणली. अनेकांना लिहितं केलं. वानगीदाखल 'बालबोध'कार ओक, कॅन्डीबद्दल काय म्हणतात ते दिले आहे :

मी प्रांजलपणें आणि मोठ्या कृतज्ञ भावानें कबूल करतों कीं, मला मराठी लिहिण्यास मेजर क्यांडी साहेबांनी शिकवले.....मी एवढे खचित सांगतों कीं, चांगल्या गुरूनें आपल्या आवडत्या विद्यार्थ्यास जसें आस्थेनें

शिकवावें - त्याचा हात धरून त्यास सुमार्गास लावावें - त्याप्रमाणे मेजर क्यांडीसाहेबांनी मला मराठी लिहिण्याच्या मार्गास लाविलें, हे त्यांचे उपकार मी यावज्जीवन आठवीन.

आधुनिक मराठी गद्य लेखनाच्या या प्रारंभीच्या काळातील बरीचशी पुस्तकं ही भाषांतरित स्वरूपाची होती. कॅन्डीच्या असं लक्षात आलं की भाषांतर करणाऱ्या बऱ्याच जणांना इंग्लिश चांगलं समजतं; परंतु ते इंग्लिशचे मराठी भाषांतर करताना मजकूर मराठीच्या वळणाने न लिहिता इंग्रजीच्या वळणानेच लिहितात. त्यामुळे तो मराठी वाचकाला पुरेसा भावत नाही व पुष्कळदा नीटसा आकलनही होत नाही. त्याने वारंवार ही गोष्ट भाषांतरकारांच्या नजरेला आणली आहे. त्या वेळी अद्याप मराठीत फारच थोडे साहित्य उपलब्ध होते. त्यामुळे नवशिक्षितांच्या वाचनात मुख्यत्वे इंग्लिशमधील वैचारिक आणि ललित साहित्यच येत असे. त्याचाही परिणाम त्यांच्या मराठी लिखाणावर होत होता. त्यामुळे ही मंडळी जेव्हा मराठी लिहीत ते पुष्कळदा इंग्लिश वळणाने लिहिलं जाई. या परिस्थितीचा विचार करून त्याने १८५० साली डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनच्या सूचनेवरून 'हिंट्स फॉर द गायडन्स ऑफ ट्रान्सलेटर्स' या शीर्षकाखाली भाषांतरकारांना उपयोगी असे बारा नियम तयार केले होते. हे नियम आजही भाषांतर करणाऱ्यांना मार्गदर्शक ठरावेत असे आहेत.

कॅन्डी १८२६ साली शब्दकोशाच्या योजनेत मोल्सवर्थचा सहाय्यक म्हणून काम करू लागला, तेव्हापासून, १८७६ साली प्रकृतीच्या कारणास्तव 'ट्रान्सलेटर व रेफरी' या पदाचा राजीनामा देईपर्यंत, सुमारे पन्नास वर्षं त्याने मराठी भाषेची विविध प्रकारे सेवा केली. मराठी शुद्धलेखनाची एक प्रमाणित पद्धत बसवण्याचा प्रयत्न केला. तो पुस्तकं तपासताना अतिशय बारकाईने शब्दांचं शुद्धलेखन तर बघतच असे; पण त्याचबरोबर वाक्यरचना मराठीच्या प्रकृतीला जुळणारी आहे ना, हेही बघत असे. अनेकांकडून त्याने इंग्लिश पुस्तकांची भाषांतरं करून घेतली. अनेकांना लिहितं केलं. कादंबरी, नाटक, निबंध इत्यादी, तोपर्यंत मराठीत सहसा न हाताळल्या गेलेल्या सर्व साहित्य प्रकारांतील पुस्तकांचाही त्याने चोखंदळपणे विचार केला. तो फक्त शुद्धलेखन तपासणारा पंतोजी नव्हता. तर तो एक अस्सल ग्रंथ-संपादक होता. त्याचं सर्व काम मुख्यतः गद्य

साहित्याशी संबंधित होतं; मात्र त्याच्या हातून एका चिरकाल टिकणाऱ्या काव्य-संकलनाचं कार्य झालं. मला अभिप्रेत आहे तो ग्रंथ 'नवनीत.'

'नवनीत' हे मराठी भाषेतील अभिजात साहित्याची कदर असलेल्या प्रत्येकाने संग्रही ठेवावं असं संकलन आहे. हे इंग्रजी आमदनीच्या पूर्वीच्या ज्ञानेश्वरांपासून ते रामजोशीपर्यंत सर्व कवींच्या निवडक उताऱ्यांचे संकलन आहे. इंग्रजीचा प्रभाव न पडलेली मराठमोळी मराठी आपल्याला या संग्रहात भेटते. या संग्रहाबद्दल इतिहासाचार्य राजवाडे यांनी असं लिहिलं आहे की, 'परशुरामपंत तात्या गोडबोले ह्यांनी छापलेल्या काव्यांनी मला महाराष्ट्र सारस्वतांचा अभिमान वाटू लागला.' शालेय विद्यार्थ्यांसाठी एक काव्य संकलन करून घेण्याचा विचार जेव्हा पुढे आला तेव्हा कॅन्डीने तो तात्काळ उचलून धरला आणि त्यासाठी संपादक म्हणून, अतिशय योग्य अशा व्यक्तीची - परशुरामतात्या गोडबोले यांची निवड केली. परशुरामतात्यांनी अतिशय विचक्षक दृष्टीने 'नवनीत' हे संकलन तयार केलं. पु. ल. देशपांडे म्हणतात, 'या ग्रंथावर माझी काव्याभिरुची पोसली गेली. हाच अभिप्राय अनेक ज्येष्ठ कवींचा आणि साहित्यिकांचा असेल यात शंका नाही. या संकलनासाठी मराठी साहित्य रसिक, कॅन्डी आणि परशुरामतात्या या दोघांचे कायम ऋणी राहतील.' असो.

कॅन्डीचं कार्य आणि कर्तृत्व याचा केवळ एका लेखात संपूर्ण आढावा घेणे शक्य नाही. तो अत्यंत धर्मपरायण ख्रिश्चन होता; परंतु त्याची धार्मिकता त्याच्या ग्रंथाच्या निवडीत त्याने कधी डोकावू दिली नाही. त्याच्या कार्याचा गौरव, त्याच्या मृत्यूच्या केवळ एक महिना आधी, ब्रिटिश सरकारने त्याला १८७७ सालच्या दिल्ली दरबारात 'कम्पॅनिअन ऑफ दी स्टार ऑफ इंडिया' (सी. एस. आय.) हा किताब देऊन केला. जानेवारी १८७७ मध्ये हा किताब मिळाल्यानंतर लगेचच फेब्रुवारी १८७७च्या २२ तारखेला थॉमस कॅन्डी अत्यंत शांतपणे महाबळेश्वर येथे ख्रिस्तवासी झाला. त्याची स्मृतिशिला व कबर अलीकडेच श्री. अनिल मेहतांनी शोधून काढली. कॅन्डीने मराठीसाठी केलेले कार्य लक्षात घेऊन त्याचे उचित स्मारक महाबळेश्वरला केले जाईल, अशी आशा करायला हरकत नाही.

पुस्तकांच्या आगीचा दाह

– कवी सौमित्र

आगीनं व्यापलेले पुस्तकांचे कोपरे पाहिले की पुस्तकातली माणसं आक्रोश करत असल्याचे आवाज कानावर येतात. नुकतंच मुंबईतील एक प्रसिद्ध पुस्तकाचं दुकान आगीच्या भक्ष्यस्थानी पडलं आणि अनेक पुस्तकवेडी माणसं हळवी झाली. सच्चा वाचकाला अस्वस्थ करेल, अशीच ही घटना. या घटनेनंतर अभिनेते किशोर कदम अर्थात कवी सौमित्र यांनी व्यक्त केलेल्या भावना समस्त वाचकांच्या मनीचे बोल आहेत. म्हणूनच फेसबुकवर ही पोस्ट वाऱ्यासारखी पसरली आणि अनेकांना त्यात आपल्या भावनांचं प्रतिबिंब पाहता आलं.

फोर्टच्या आगीत 'किताबखाना' जळून खाक

आधीच चांगल्या पुस्तकांची दुकानं मुंबईत नाहीत... सगळीकडे क्रॉसवर्ड..., तेही इकडून तिकडे तिकडून इकडे दिसत राहतं. काही वर्षांपूर्वी बांद्रा वेस्टला एसव्ही रोडवर 'लोटस' नावाचं पुस्तकांचं दुकान होतं, जिथे मला आठवतंय गोविंद निहलानीजींनी मला (तेव्हा मी त्यांचं प्रोडक्शन बघत होतो) 'लोटस'ला काही पुस्तकं कलेक्ट करायला पाठवलं होतं. त्या पूर्वी आयडियल आणि मॅजेस्टिक पाहिलेला मी एसीच्या गारव्यात सुखावलेली पुस्तकं हरखून पाहत होतो. गोविंदजींच्या घरी त्या आधी पाहिलेले कितीतरी जागतिक लेखक तिथे हातात हात घालून थंडगार शेल्व्हज्मध्ये उभे असलेले दिसले... कितीतरी वेळ ती पुस्तकं चाळत उभा होतो आणि अचानक एक सुंदरी लांबट ग्लासातून सोनेरी वाइन घेऊन आली ...

'सर..!' .....माझ्यासमोर ट्रे करत ती मला म्हणाली.

मी बावचळून तो ग्लास घेतला... ती निघून गेल्यावर एकेक घुटका घेत मी पुन्हा पुस्तकं पाहू लागलो.. विराट चांडोक नावाचा ....नावाला जागणारा ...विराट वाचन असलेला..सेल्समन तिथे भेटला, ज्याने जवळ जवळ

तिथली सगळीच पुस्तकं वाचल्यागत पुस्तकांची, लेखकांची माहिती उत्साहात देत होता... त्यानंतर कितीतरी वेळा गोविंदजींनी न पाठवताही मी तिथे जाऊ लागलो. पुस्तकांच्या किमतींमुळे विकत घेण्याचा प्रश्नच नव्हता. तिथे उभ्या उभ्या कितीतरी पुस्तकं अर्धीमुर्धी मी वाचूनही काढली होती.

आणि एक दिवस अचानक कळलं लोटस बंद झालं.

बातमी ऐकून मन खिन्न झालं.

मग अंधेरी वेस्ट इन्फिनिटीमधलं प्रशस्त असं लँडमार्क आयुष्यात आलं. प्रशस्त आणि वेगळी पुस्तकं मिळणारं दुकान. एका मोठ्याशा मॉलमध्ये... घरापासून जवळ. कामाच्या येत्या-जात्या मर्गावर. तिथेही आयुष्यातला बराच भाग पुस्तकं चाळण्यात, विकत घेण्यात गेला.

आणि एक दिवस अचानक तेही बंद झाल्याचं कळलं...

पुस्तकांच्या दुकानाजागी कुठल्यातरी इंटरनॅशनल ब्रॅण्डच्या कपड्यांचं दुकान उभं राहिलं... मग कधीतरी... टाउनमध्ये 'वे वर्ड ॲन्ड वाईज' नावाचं अतिशय रेअर पुस्तकांचं दुकान झाल्याचं कळलं.. मी, निखिलेश, स्वप्निल एक दिवस ठरवून तिथे गेलो... फारच वेगळ्या आणि रेअर पुस्तकांचं ते जणू भांडारच होतं... आणि इतक्या वर्षांच्या गॅपनंतर तिथल्या काउंटरवर दिसला तो विराट वाचन असलेला विराट चांडोकच.

पुस्तकांच्या दुकानात हरवलेलं आपलं पैशांचं पाकीट तो पुस्तकांच्या दुकानातच शोधत होता. तिथेही तो आवर्जून प्रत्येक पुस्तकाबद्दल, लेखकांबद्दल खूप उत्साहाने सांगत होता.

तिघांनी मिळून जवळ जवळ तेवीस हजारांच्या आसपास खरेदी केली होती. आणि बाय द वे... तिथंही मालकाने इतकी खरेदी पाहून आमच्यासाठी महागड्या वाइनची बाटली उघडली होती.

मग कधीही टाउनला गेलो की 'वे वर्ड...' मध्ये चक्कर ठरलेलीच असायची.

आणि एक दिवस अचानक कळलं 'वे वर्ड...' बंद झालं.

त्या आधी जुनं जाणतं स्ट्रॅन्ड बंद झालं होतं ...

त्या आधी खूप... चर्चगेट पासून फ्लोरा फाउंटनपर्यंत मांडलेला, जुन्या पुस्तकांचा बाजार उठवण्यात आला होता.

लोकवाङ्मयचं 'पीपीएच' तेवढं सुरूय अजून.

आणि आज अचानक किताबखाना जळाल्याचं कळलं.

'फोर्टच्या आगीत किताबखाना जळून खाक' या बातमीने एकदम मला 'फेरनहिट ४५१'ची आठवण झाली. ज्यात ज्यो माँटँग नावाचा अग्निशमन दलात काम करणारा कामगार राज्याच्या पुस्तकांवर बंदी आणून, जाळण्याच्या सेन्सरशिप कायद्यालाच उलटा प्रश्न विचारतो. ब्रॅडबरी नावाच्या जागतिक कीर्तीच्या लेखकाच्या याच नावाच्या कथेवर २००० ते २००९ अशी बंदी आणण्यात आली होती.

एखादी व्यवस्था जेव्हा पुस्तकातल्या मजकुरावर आक्षेप घेत पुस्तकच बॅन करते तेव्हा त्या पुस्तकातल्या मजकुराचा त्या व्यवस्थेने नक्कीच धसका घेतलेला असतो. आणि ते पुस्तक वाचून समाजात काही विचारमंथन होऊन खळबळ माजेल... लोक शहाणे होतील किंवा वेडे होतील... या दोन्ही शक्यतांना गृहीत धरत आपल्या स्थानाला धक्का पोहोचू नये वा विचारसरणीच्या विरोधातले विचार मांडले जाऊ नयेत म्हणून जेव्हा शासन पुस्तक बॅन करण्याचा वा जाळण्याचा निर्णय घेतं तेव्हा, ते पुस्तक समाजात मोठ्या प्रमाणात वाचलं जाईल हे शासनाने गृहीत धरलेलं असतं.

पण, आपल्याकडे लोक पुस्तकं वाचतच नाहीत म्हणून लोटस, स्ट्रॅन्ड, लँडमार्क, वे वर्ड ॲन्ड वाईज आणि जुन्या पुस्तकांची दुकानंही बंद होताहेत.

जो समाज पुस्तकांची दुकानं जिवंत ठेवू शकत नाही तो समृद्ध समाज कधीच होऊ शकत नाही आणि तोच समाज आपण होत चाललो आहोत.

या पुढे अशीच पुस्तकांची दुकानं आपल्याच पुस्तक वाचनाच्या उदासीनते- मुळे, निरक्षरतेमुळे बंद पडत जातील... जी अडचणीची पुस्तकं असतील त्यांवर सेन्सरशिप लादली जाईल आणि एक दिवस लोकांना घाबरवण्यासाठी पुस्तकांची सार्वजनिक होळी करून पुस्तक नावाची वस्तूच नष्ट केली जाईल...

कदाचित अशी वेळ येईल...

तुमच्या-माझ्या सारख्यांच्या, घरांच्या भिंतींना सुशिक्षित वाटावं म्हणून डिझाइनच्या नावाखालीच्या काही उच्चवर्गीयांच्या, काही तथाकथित बुद्धिवाद्यांच्या घरी जी पुस्तकं उरली असतील, तेवढीच काय ती खूण उरलेली असेल एक पुस्तक म्हणून.

(तसंही डिजिटलायझेशन आपल्या माथी बसलेलंच आहे. एका किंडल

आयपॅडमध्ये हजारो पुस्तकं मावताहेत. अवकाशातल्या माहितीचा कचरा दिवसेंदिवस वाढतोच आहे. एक दिवस त्याचीही विल्हेवाट कशी लावायची हा प्रश्न निर्माण होईल. अवकाशात कचरा आणि जमिनीवर ऑटोमेशन, संगणकीय जगणं... यांच्यात कागद कुठे असेल !)

पुस्तकाची दुकानं चालत नाहीतच्या कारणे पुस्तकांची दुकानं बंद पडताहेत, अशा कुपोषित काळात आपण जगत आहोत.

पुस्तकांच्या दुकानांच्या जागा इंटरनॅशनल ब्रॅण्डच्या कपड्यांच्या कंपन्यांनी विकत घेण्याच्या ग्लोबलाईज्ड काळात आपण जगत आहोत.

या रे... वाचा रे... यावर ते पुस्तक फुकट घ्या रे... अशा नवनवीन कल्पना जाहीर करत सतत लोकांना वाचनासाठी प्रोत्साहित करण्यासाठी पुस्तक विक्रेत्यांनी भीक मागितल्यासारखं करत राहण्याच्या दयनीय काळात आपण जगत आहोत.

पुस्तकांची दुकानं जळून खाक होण्याच्या या अभद्र कोरोना काळात आपण जगतो आहोत. पुस्तकांची दुकानं उगाच जळत नसतात. प्रचंड काही उलथापालथ चाललेली असते. साक्षरांना निरक्षर करणाऱ्या समाजात पुस्तकांची दुकानं वाट पाहत असतात, कुणीच न आल्याने निराश झालेल्या मालकासाठी सवलतीतही उभी राहतात.

पुस्तकांची दुकानं आपोआप जळत नाहीत. कुठेतरी कुणीतरी फार आधी चूड लावून गेलेलं असतं ज्ञानाच्या खोल खोल खाईत. पुस्तकांची दुकानं झाडं आठवत बसतात, कागदांसाठी हळहळतात, आठवणींच्या जंगलांत एकेक अक्षर आत्महत्या करतं वाळवीच्या मुखात. पुस्तकांची दुकानं बंद होणं, पुस्तकांची राख वाचकाच्या डोळ्यांत मोतिबिंदू होणं, कुणीच वाचलं न जाऊन विरत नष्ट होणं, येणाऱ्या पिढीमध्ये दिशाहीन दिसतो, कागदाच्या पानोपानी आवाजात वसतो, हाच त्या समाजाला पुस्तकांचा शाप असतो. पुस्तकांचं दुकान जळणं ही एक सामाजिक घटना असते. ही कशाची तरी सुरुवात असते

पुस्तकांची दुकानं उगाच जळत नसतात ...

नवी संहिता... नवा आशय...

मदाम

बटरफ्लाय



रेई किमुरा

अनुवाद

डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

जपानच्या फुलपाखरासारख्या नाजूक मदाम च्यो-च्योची आशेनिराशेच्या हिंदोळ्यावर भिरभिरणारी हळवी अलवार कहाणी..

किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध

कॉकटेल कार्निव्हल

रोचक, रंजक, रोमांचक कथोत्सव

चेतन जोशी

अनुवाद

मंजिरी धामणकर

कॅनव्हास तोच, माणसं तीच..

पण हटके अभिव्यक्ती असलेल्या अफलातून कथा...

किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध



गुंतवणुकीची कामधेनू

डॉ. अनिल गांधी

गुंतवणुकीचे नेमके, सटीक मार्गदर्शन

पैसा मिळवणे आणि तो साठवणे हा माणसाचा एक महत्त्वाचा गुणधर्म आहे. मनुष्य हा जगात एकमेव प्राणी आहे जो आपल्या भविष्याची तरतूद करून ठेवतो. हातात आलेला पैसा योग्य पद्धतीने वापरणे ही एक प्रकारची कला आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आता ही कला काहींना आत्मसात असते तर काहींना ती सरावाने शिकावी लागते. यातही खर्चासाठी लागणारा पैसा आणि गुंतवणूक अशा दोन महत्त्वाच्या

बाबी आहेत. योग्य पद्धतीने केलेली गुंतवणूक अडचणीच्या वेळी आपल्या निश्चितच कामी येऊ शकते हे सर्वांना माहीत आहेच; मात्र ती नेमकी कशी करायची, त्याचे योग्य ते पर्याय आणि मार्ग कोणते, कोणत्या पर्यायाने आपला अधिक फायदा होईल याबाबत जाणून घेणे महत्त्वाचे आहे. लेखकाने आपल्या 'गुंतवणुकीची कामधेनू' या पुस्तकात याविषयी विस्ताराने लिहिले आहे. विविध पाठांमध्ये लेखकाने गुंतवणूक या विषयाचा आढावा घेतला आहे.

आपले उत्पन्न, दैनंदिन गरजा आणि भविष्यासाठीची तरतूद याचा ताळेबंद प्रत्येकाला आयुष्याच्या विशिष्ट टप्प्यावर मांडावाच लागतो. भारतीय मानसिकतेनुसार आजही गुंतवणुकीचे काही ठरावीक पर्यायच प्रामुख्याने निवडले जातात. यामध्ये, जागा, सोने आणि बचत ठेवी हे पर्याय वापरले जातात; मात्र शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यासारख्या महत्त्वाच्या उपायांपासून मोठा वर्ग अनभिज्ञ असतो. शेअर्समधील गुंतवणूक ही पारदर्शी असल्याने त्यातून झालेला नफा आपण उघडपणे दाखवू शकतो. आता शेअर्स म्हणजे काय? शेअर मार्केटचे गणित कसे असते, यामध्ये गुंतवणूक करायची असल्यास काय करावे लागते, यातही वेगवेगळे काय पर्याय असतात, अशा प्रश्नांची उत्तरे या पुस्तकात देण्यात आली आहेत. पुस्तकात अतिशय सोपी भाषा वापरल्याने सामान्य व्यक्तीलाही हा विषय समजणे अतिशय सोपे होते.

गुंतवणुकीच्या बाबी आपल्याला अवघड वाटत असल्या तरीही दीर्घकालीन फायद्याच्या असतात हे नक्की. डॉ. अनिल गांधी यांनी या गोष्टी सोप्या करून सांगण्यासाठी दैनंदिन जीवनातील उदाहरणे दिली आहेत. अगदी डिमॅट खाते कसे उघडायचे इथपासून ते प्रत्यक्ष शेअर्समध्ये गुंतवणूक करताना कोणत्या गोष्टीची काळजी घ्यायला हवी याविषयी नेमकेपणाने सांगितले आहे. तसेच, पुस्तकात अतिमहत्त्वाच्या गोष्टी चौकटीत देण्यात आल्याने त्या वाचकाच्या ठळकपणे लक्षात येतात. शेअर्समध्ये गुंतवणूक करताना चांगल्या कंपन्या कशा निवडायच्या, भावनेच्या आहारी न जाता व्यवहार कसे करायचे याबाबत अतिशय उत्तम मार्गदर्शन करण्यात आले आहे. त्यामुळे नव्याने या क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्यांसाठीही हे पुस्तक नक्कीच उपयुक्त ठरेल असेच आहे. वेगवेगळया तक्त्यांच्या माध्यमातून

सर्व शेअर बाजाराची गणिते समजावून सांगितल्याने गुंतवणूकदारांना विषय समजणे सोपे होणार आहे. शेअर बाजार म्हणजे सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे किंवा कामधेनू आहे असे अनेकांना वाटते. मात्र यामध्ये नशिबाचा भाग असला तरीही योग्य तो अभ्यास करून केलेली गुंतवणूक दीर्घ काळासाठी फायदेशीर ठरते हाच संदेश हे पुस्तक नेमकेपणाने देते.

- पराग पोतदार

नवी संहिता... नवा आशय...

लेडी जल्लाद



के. आर. मीरा

अनुवाद

रेश्मा कुलकर्णी-पाठारे

ग्रद्धा मलिक कुटुंबीयांच्या गाठोड्यामध्ये गेल्या कित्येक शतकांतल्या फाशी आणि जल्लादांच्या रोचक कथा आढळतात. त्यातील बहुतेक कथांमधील प्रमुख पात्र, हे त्यांच्याच कुटुंबीयांपैकी एक आहे. पिढ्यान्‌पिढ्या जल्लादाचं काम करणारं हे कुटुंब, भारताच्या इतिहासातील कित्येक महत्त्वाच्या घटनांचं नुसतं साक्षीदारच नव्हे, तर शिल्पकारही आहे. २२ वर्षांच्या चेतना ग्रद्धा मलिकला भारतातील पहिली स्त्री जल्लाद आणि आपले वडील फणीभूषण ग्रद्धा मलिक यांची सहायक व उत्तराधिकारी म्हणून नेमण्यात आल्यावर, तिच्या आयुष्यात प्रचंड उलथापालथ होते. गावाच्या वेशीच्याही फारशी बाहेर न गेलेली चेतना या नियुक्तीमुळे अचानक प्रसारमाध्यमांच्या प्रकाशझोतात येते. मात्र, प्रत्यक्ष फाशी देण्याचा दिवस येऊन ठेपल्यावर चेतना त्या गुन्हेगाराचा जीव घेऊ शकेल का?

किंमत : ५९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध

नवी संहिता... नवा आशय...

आत्मवंचना

अरुण शौरी

अनुवाद

अशोक पाथरकर

भारत-चीन संबंधांबाबतच्या
भारताच्या बोटचेप्या, विस्कळीत
धोरणांवरचं अरुण शौरी यांचं
अभ्यासपूर्ण, परखड भाष्य...

किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध

जालियनवाला बाग

अमेय जाधव



जालियनवाला बाग हत्याकांडाच्या
पाशवी वर्तणुकीविरोधातला
एका ध्येयवेड्याचा एल्गार...
राष्ट्रनिष्ठा आणि ध्येयासक्तीची
विलक्षण कहाणी..

किंमत : ४९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध

द मॅजिक ऑफ गेटिंग व्हॉट यू वॉन्ट

डॉ. डेव्हिड जे. श्वार्ट्झ

अनुवाद : **स्नेहलता जोशी**

■

व्यक्तिगत आशा-आकांक्षांची पूर्ती करणारी ब्ल्यू-प्रिंट...

'द मॅजिक ऑफ गेटिंग व्हॉट यू वॉन्ट' अर्थात 'किमया! हवे ते प्राप्त करण्याची' हे पुस्तक तुमच्या व्यक्तिगत आशा-आकांक्षांची पूर्ती करण्यासाठी तुमच्यासमोर ठेवलेली ब्ल्यू-प्रिंटच. मोटिव्हेशन-प्रेरणा या विषयावर अधिकारवाणीने बोलणाऱ्या आणि लिहिणाऱ्या आणि 'द मॅजिक ऑफ थिंकिंग बिग' या सर्वाधिक खपाच्या पुस्तकाचे लेखक डॉ. डेव्हिड

श्वार्त्झ यांचे 'द मॅजिक ऑफ गेटिंग व्हॉट यू वॉन्ट' हे तितक्याच तोलामोलाचे पुस्तक अतिशय वाचनीय, वास्तववादी आणि मनाला उभारी देणारे आहे.

आयुष्याकडे आणि प्रत्येक समस्येकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले, आपले ध्येय कल्पकतेने निश्चित करून त्याप्रमाणे कृती केली तर आपण भरभरून समृद्धी मिळवू शकतो, समाजावर जबरदस्त प्रभाव टाकू शकतो आणि जीवनातला आनंद मनमुराद उपभोगू शकतो, हे या पुस्तकात प्रामुख्याने सांगितले आहे. ते कसे करायचे याचे विस्तृत मार्गदर्शन या पुस्तकात केले आहे.

ध्येयप्राप्तीसाठी प्रथम आपल्याजवळ उपलब्ध असलेली खास साधने आणि आपल्या सुप्त क्षमता यांचे विश्लेषण केले पाहिजे आणि त्यांच्या जोरावर आपल्याला नेमके काय करता येईल हे ठरविले पाहिजे. अर्थात काही मोठे साध्य करण्यासाठी इतर गोष्टींचा त्याग करावा लागतो, तडजोडी कराव्या लागतात, त्याची तयारी असली पाहिजे.

आपल्याला आपल्या आयुष्याचे काय करायचे आहे याची कल्पना अनेकांना असते, फक्त ते कसे करायचे हे कळत नसते. त्यासाठी इतर यशस्वी लोकांनी त्यांची अशीच ध्येये गाठण्यासाठी कोणते मार्ग अवलंबिले होते याची आठवण करून देणे किंवा माहिती देणे फार प्रेरणादायी ठरते.

हे पुस्तक जमिनीवर पाय रोवून आकाशाला गवसणी घालण्यासाठी विजयाचे सिद्धान्त उभारणाऱ्या प्रत्येकासाठी प्रेरित करणारा आणि यशाची प्रचिती देणारा दीपस्तंभ आहे. लेखकाने समोर ठेवलेल्या सगळ्या उदाहरणांतून आणि सांगितलेल्या सत्यकथांमधून लेखकाचा 'यशस्वितेच्या तत्त्वज्ञानातून यशस्वी वीर निर्माण होतात' हा विश्वास सातत्याने प्रकट होत राहतो. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हा 'अधिक'चा विचार केवळ व्यक्तीपुरता नसून स्वत:बरोबर स्वत:चे कुटुंब, मित्र, सहकारी, काम करत असलेली संस्था आणि समाज या सर्वांच्याच भल्याचा आहे हे विशेष.

या पुस्तकात लेखक डेव्हिड जे. श्वार्त्झ यांनी यशस्वी होण्यासाठी त्यांनी शोधलेली खास सूत्रे आपल्यासमोर विस्तारपूर्वक मांडली आहेत; तसेच ती वापरण्याची तंत्रेही समजावून दिली आहेत. हे मंत्र आणि तंत्र आपल्याला आयुष्यात जे जे हवे आहे ते ते प्राप्त करण्यासाठी हमखास मदत

करणारे आहेत. जेव्हा तुम्ही हे प्रत्यक्ष आचरणात आणाल, तेव्हा जो सुपरिणाम तुम्हाला दिसेल तो अगदी जादुई असेल यात शंका नाही.

या पुस्तकात तुम्हाला अनेक बहुमूल्य गोष्टी गवसतील. आपण सगळे विजयी होण्यासाठीच जन्माला आलेलो असतो. तुम्ही जसा विचार कराल तसे तुम्हाला फळ मिळेल. म्हणून विचार करताना मूर्ख माणसासारखा विचार करू नका. मी अमुक एक गोष्ट करू शकतो, असा विचार करा. सकारात्मक राहा आणि पाहा तुम्ही ज्याची इच्छा धरली ते तुम्हाला मिळणारच! प्रत्यक्ष जीवनातील अनेक दाखले देत लेखकाने प्रत्येक मुद्दा सविस्तरपणे मांडला आहे. हे पुस्तक अनेक अर्थपूर्ण मुद्द्यांनी समृद्ध झालेले असून, आपल्या रोजच्या आयुष्यात त्याचा मोठा उपयोग होणार आहे. निराशेच्या गर्तेत कोसळलेल्या माणसाला पुन्हा संपन्न जीवनाकडे कसे परतता येईल याची दिव्य अंतर्दृष्टी हे पुस्तक देते. A.S.K. आणि सातत्यपूर्ण चिकाटी अर्थात पेशन्स या पुस्तकातील सर्वोत्तम गुरुकिल्ल्या आहेत.

मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB

टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक - G Pay +91 94223 23039

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx



सचित्र रामायण

लेखक : **डॉ. वृषाली पटवर्धन**

किंमत : ₹ २५०

किशोरकथा

राम - लक्ष्मण - भरत - शत्रुघ्न यांच्या जन्माचा सगळ्यांना इतका आनंद का झाला...या चौघांनी वसिष्ठांकडे शिक्षण घेतल्यानंतरही विश्वामित्र ऋषींनी राम आणि लक्ष्मणाला त्यांच्या बरोबर पाठवण्याची मागणी का केली...स्वयंवराच्या वेळी सीतेने रामाच्याच गळ्यात वरमाला का घातली... राम-लक्ष्मण लंकेत कसे पोचले... राम-रावण युद्धादरम्यान मारुतीने पर्वत का उचलून आणला... रामाने रावणाचा वध करून बिभीषणाला राज्याभिषेक का केला...वनवासानंतर अयोध्येचा राजा झालेल्या रामाने सीतेचा त्याग का केला...या सगळ्या प्रश्नांची उत्तरं बालदोस्तांनो तुम्हाला मिळतील रामायणात आणि चित्रांसह बरं का!

मेहता पब्लिशिंग हाऊस
फोन : (०२०) २४४७६९२४, २४४७५४६२
E-mail : sales@mehtapublishinghouse.com

मेहता बुक सेलर्स
कोल्हापूर ✆ : (०२३१) २५४२९०१
Email : mehtabooksellers@gmail.com

P-BOOK & E-BOOK AVAILABLE ON : www.mehtapublishinghouse.com | amazon.in | flipkart.com | play.google.com | : 9420594665



आय हॅव अ ड्रीम

रश्मी बन्सल

अनुवाद : **कीर्ती परचुरे**

परिवर्तन घडविणाऱ्या व्यक्ती आणि वल्लींचा जीवनवेध घेणाऱ्या रश्मी बन्सल लिखित पुस्तकाचा अंश...

रेंजमेकर्स

सामाजिक उद्योग, जिथं उत्पन्न मिळवलं जातं; पण नफा कमावणं हे त्यांचं उद्दिष्ट नसतं. नव्या युगातल्या उद्योजकांची ही नवी पिढी आहे. फक्त काहीतरी धर्मार्थ करण्याऐवजी काहीतरी चांगलं करण्यावर त्यांचा भर आहे.

कास्ट अवे - बिंदेश्वर पाठक - सुलभ इंटरनॅशनल

लहान असताना बिंदेश्वरांनी एका अस्पृश्याला स्पर्श केला म्हणून आजीनं त्यांना अक्षरश: शेण खायला लावलं होतं... त्यांचं 'शुद्धीकरण' व्हावं म्हणून. मोठेपणी याच ब्राह्मण मुलानं एक चळवळ उभारली, जिचं नाव होतं, 'सुलभ.' अभिनव पद्धतीची टॉयलेट्स उभारून त्यांनी ती स्वच्छ करणाऱ्यांच्या आयुष्यात क्रांती आणली.

कचऱ्यातले माणिकमोती - अनिता आहुजा - कॉन्झर्व्ह इंडिया

दिल्लीतल्या टिपिकल सुखवस्तू स्त्रियांप्रमाणेच अनितानंही समाजसेवा करायला सुरुवात केली; पण कचरा वेचणाऱ्या मुलांचे हाल पाहून ती खूप अस्वस्थ झाली. त्यांच्या आयुष्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी तिनं काहीतरी करायचं ठरवलं. आज अनिता आणि तिचे पती शलभ एका अभिनव कामातून उत्पन्ननिर्मिती करतात आणि कचरा वेचणाऱ्यांना मदतही. त्यांची कंपनी कचऱ्यापासून निर्यातक्षम हँडबॅग्ज बनवते.

नफ्याच्या पलीकडे - विनीत राय - आविष्कार सोशल व्हेंचर फंड

विनीत राय GIAN संस्थेचा सीईओ बनला ते जरा अपघातानंच. GIAN ही संस्था तळागाळातल्या लोकांच्या अभिनव संकल्पनांना पाठिंबा देण्याचं काम करते. तिथं काम करतानाच त्याला ग्रामीण भागातील उद्योजकांसाठी मायक्रोव्हेंचर फंड देणारी संस्था स्थापन करायची कल्पना सुचली. सध्या आविष्कार २३ कंपन्यांना पाठिंबा देत आहे, ज्या नफा कमावतात आणि गुंतवणूकदारांना परतावेही देतात. महत्त्वाचं म्हणजे या कंपन्या सामाजिक प्रश्नांवर काम करतात.

बंध नात्यांचे - सुमिता घोस - रंगसूत्र

सुमितानं एका अत्यंत आदर्श तरुणाशी संजॉय घोसशी लग्न केलं होतं. संजॉय आयआरएमचा पदवीधर होता आणि एनजीओ क्षेत्रात चांगलं करिअर करत होता. १९९८ मध्ये उल्फाच्या अतिरेक्यांनी त्याची हत्या केली. त्या धक्क्यानं कोसळलेल्या सुमिताला आयुष्याची परत नव्यानं सुरुवात करावी लागली. आज ती 'रंगसूत्र' नावाची संस्था चालवते. ही संस्था खेडेगावातल्या लोकांकडून कापड आणि शोभेच्या वस्तू बनवून घेते आणि फॅब इंडियाला विकते.

गावाकडचा रस्ता - सलोनी मल्होत्रा - देसी क्रू

नुकतीच इंजिनिअरिंगची डिग्री घेतलेल्या तेवीस वर्षांच्या सलोनीने आयुष्यात काहीतरी वेगळं करायचं ठरवलं. तिच्या हातात तीनच मुद्दे होते... ग्रामीण, तंत्रज्ञान आणि व्यवसाय! तिनं हे तिन्ही मुद्दे जोडले आणि भारतातल्या पहिल्या ग्रामीण बीपीओची- 'देसी क्रू'ची निर्मिता केली. या प्रोजेक्टमुळे आयआयटी मद्रासच्या शिरपेचात आणखा एक मानाचा तुरा खोवला गेलाय; कारण त्यांनी या संकल्पनेला खतपाणी घातलं होतं.

चेंजमेकर्स

एकटा मनुष्य एक आख्खी चळवळ उभी करतो... लोक त्याला 'हे काय' असं विचारत राहतात आणि तो मात्र हे काय असायला हवं ते त्यांना आपल्या प्रयत्नांतून दाखवून देतो.

विज्ञाननिष्ठ समाजसेवक - माधव चव्हाण - प्रथम

राजकीय पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबात जन्मलेले माधव चव्हाण मोठेपणी कम्युनिस्ट नेते बनायच्याच बेतात होते; पण बदलांच्या वाऱ्यांनी त्यांचीही दिशा बदलली. परदेशात राहून पीएच.डी. केल्यानंतर माधव भारतात परतले आणि 'शिक्षणाला' त्यांनी आपल्या आयुष्याचं मिशन बनवलं. आज त्यांची ही संस्था प्रथम एनजीओंच्या क्षेत्रातली सर्वांत मोठी संस्था आहे. ही संस्था सरकारच्या मदतीनं लाखो मुलांचं भवितव्य घडवण्यात गुंतली आहे.

कशासाठी... उबेसाठी - अंशू गुप्ता - गूंज

मास कम्युनिकेशनमध्ये काम करणाऱ्या अंशूनं तळागाळातल्या लोकांपर्यंत एक वेगळाच संदेश 'कम्युनिकेट' करायचं ठरवलं. पद्धतशीर कलेक्शन, विभागणी आणि डिलिव्हरीद्वारे 'गूंज', शहरी भारतानं टाकून दिलेला प्रत्येक कपडा गरजूंपर्यंत पोचवते. हे कपडे कुणालातरी सन्मानानं वापरता यावेत यासाठी गूंज अहोरात्र झटत असते.

कला लढण्याची - त्रिलोचन शास्त्री - असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म (एडीआर)

आयआयटी- आयआयएम ग्रॅज्युएट असलेले त्रिलोचन शास्त्री

आरामात खुर्चीत बसून देशाच्या स्थितीवर टीका करणाऱ्यांपैकी एक बनू शकले असते; पण त्यांनी केलेल्या एका साध्या पण धाडसी जनहित याचिकेमुळे आज सार्वजनिक जीवनमान उंचावलं आहे. आता हळूहळू का होईना पण लोकप्रतिनिधी निवडण्याची आपली पद्धत बदलण्याचा ते प्रयत्न करत आहेत.

गोष्ट शाहीन नावाच्या मुलीची - शाहीन मिस्त्री - आकांक्षा

कॉलेजमध्ये असताना शाहीननं तिच्या मित्र-मैत्रिणींना झोपडपट्टीतल्या मुलांना शिकवण्यासाठी मदत करायला बोलावलं होतं. १५ मुलांना घेऊन एका छोट्याशा, भाड्याच्या खोलीत तिनं सुरू केलेल्या या उपक्रमात आज सहा शाळा आणि ५८ केंद्रांतल्या साडेतीन हजार मुलांना शिकवण्यात येतं. त्याच्या जोडीला देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी तरुणांनी योगदान द्यावं म्हणून त्यांना प्रोत्साहनही दिलं जातं.

स्वातंत्र्याच्या स्वर्गात - अरविंद केजरीवाल - परिवर्तन

इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिसेस खात्यात अधिकारपदावर नोकरी करत असताना अरविंद केजरीवालांनी आपल्याच खात्याविरुद्ध छुपं युद्ध पुकारलं. त्यांनी सुरू केलेलं कॅम्पेन कालांतरानं 'परिवर्तन' नावाच्या चळवळीत रूपांतरित झालं. माहिती अधिकाराचा प्रभावीपणे वापर करून नागरिकांना सक्षम करण्याची सुरुवात परिवर्तननेच केली. देशात खऱ्या अर्थानं लोकशाही यावी असं अरविंद यांचं स्वप्न आहे. अशी लोकशाही, जिथं सामान्य लोकांनाच त्यांच्यावर अधिकार गाजवण्याची मुभा असेल.

स्पिरिच्युअल कॅपिटलिस्ट

सेवा करणं ही संकल्पना आता जुनाट झाली आहे; पण आजही अनेकजण सेवेसाठी स्वत:ला वाहून घेतात; कारण शुद्ध हेतू आणि नि:स्वार्थी मन प्रत्येक अडथळ्याला पार करून नवी उंची गाठू शकतं.

द्रौपदीची थाळी - मधू पंडित दासा - अक्षय पात्र

आयआयटीमध्ये शिकत असताना मधू दासा एकदा अक्षरश: आत्महत्या करता करता थांबले होते. नंतर त्यांची कृष्णावर भक्ती जडली आणि त्यांनी धार्मिकतेची कास धरली. बेंगळुरू इस्कॉनचे प्रमुख या नात्यान

ते सध्या 'अक्षय पात्र'चे नेतृत्व करत आहेत. अक्षय पात्र ही एक चळवळ आहे, जिथं दररोज दहा लाख मुलांना जेवू घालण्यासाठा धार्मिकता आणि आधुनिक व्यवस्थापन कौशल्य यांचा सुरेख मिलाफ साधण्यात आलाय.

वी आर अ फॅमिली - विनायक लोहानी - परिवार आश्रम

आयआयएममधून ग्रॅज्युएट झाल्यानंतर विनायकनं कॉर्पोरेट भारताकडे पाठ फिरवली; कारण त्यांना मानवतेची सेवा करायची होती. त्यांच्या 'परिवार आश्रम'मध्ये अनाथ मुलं, आदिवासी मुलं आणि वेश्यांचा मुलं-मुली राहतात आणि शिक्षणही घेतात. हा 'परिवार आश्रम' आता पाचशे मुलांचं घर बनलाय.

दीपस्तंभ - श्रीश जाधव - बेलुर मठ

आपण टिपिकल करिअरकडे वळणार नाहीये, याची जाणीव श्रीशला आयआयटीमध्ये असतानाच झाली होती. तिथून ग्रॅज्युएट झाल्यानंतर त्यानं समाजसेवा करण्याचा प्रयत्न केला... आणि अखेर मनाचा कल ओळखून त्यानं संन्यासी बनायचं ठरवलं. तो आता समाजानं झिडकारलेल्यांसाठी दिशादर्शक झालाय. स्वार्थी, 'मी'पणानं भरलेल्या जगात तो इतरांना मार्ग दाखवतोय.

विशेष 'मासिक' सवलत

१ ते ३१ जानेवारी

३७.५% सवलत

१० पुस्तकांचा ₹२९२०चा संच

₹१८२५ मध्ये

स्वामी । गाभुळलेल्या चंद्रबनात । पथेर पांचाली

सार्थ । शेष । नागासाकी । फोर सीझन्स

मुघल सत्तेचा सारिपाट । भल्या दिलाचा माणूस

जाणता राजा श्री शिवछत्रपती

ऑफर दि.१ ते ३१ जानेवारी, २०२१ पर्यंत

www.mehtapublishinghouse.com | ९४२०५९४६६५ | GPay +91 94223 23039



सचित्र महाभारत

लेखक : **डॉ. वृषाली पटवर्धन**

किंमत : **₹ २९५**

किशोरकथा

व्यासांनी महाभारत का लिहिलं... ते कुणी लिहून घेतलं... देवव्रताचा भीष्म कसा झाला... कौरव-पांडवांचा, कर्णाचा जन्म कसा झाला...कुंतीने कर्णाचा त्याग का केला...कर्ण पराक्रमी असूनही त्याच्या वाट्याला अवहेलना का आली... शकुनी आणि दुर्योधनाने युधिष्ठिराला द्यूत खेळण्याचं आमंत्रण का दिलं... द्रौपदीला भर सभेत फरपटत आणून तिचं वस्त्रहरण करू पाहणाऱ्या दु:शासनाची कशी फजिती झाली...कौरवांनी घातलेली बारा वर्षांच्या वनवासाची आणि एक वर्षाच्या अज्ञातवासाची अट पांडवांनी कशी पूर्ण केली...कौरव-पांडव युद्ध का झालं...त्याचा परिणाम काय झाला...

मेहता पब्लिशिंग हाऊस
फोन : (०२०) २४४७६९२४, २४४७५४६२
E-mail : sales@mehtapublishinghouse.com

मेहता बुक सेलर्स
कोल्हापूर ✆ : (०२३१) २५४२९०१
Email : mehtabooksellers@gmail.com

P-BOOK & E-BOOK AVAILABLE ON : www.mehtapublishinghouse.com | amazon.in | flipkart.com | play.google.com | : 9420594665



रुक जाना नहीं...

डॉ. भावेश भाटिया

शब्दांकन

डॉ. सचिन पाचोरकर

अनुवाद

सुप्रिया वकील

■

आईचा कर्करोग - एक संघर्ष

आमच्या या सायकलयात्रेनंतर जवळजवळ महिनाभर मी काविळीने खूप आजारी होतो. वडिलांवर मुंबईत स्क्रिझोफ्रेनियाचे उपचार व्यवस्थित सुरू होते. त्यांचा चांगला परिणामही दिसत होता. याच दरम्यान, महाबळेश्वर येथे आरोग्य भवनात व्यवस्थापक म्हणून काम पाहणारे आमचे एक

८६ वर्षांचे परिचित वार्धक्यामुळे निवृत्ती घेणार होते. त्यांच्या जागी त्यांना ट्रस्टसाठी एक विश्वसनीय व्यक्ती हवी होती. रणछोडदास कांजी चॅरिटेबल ट्रस्ट (आर. के. वाडी) हा ट्रस्ट कच्छी भाटिया समाजाचाच होता. गेली कित्येक वर्षे सामाजिक कार्यात हा ट्रस्ट अग्रेसर होता. या ट्रस्टची बऱ्याच राज्यात धार्मिक स्थळी आरोग्य भवने होती. या ट्रस्टचे एक ऑफिस मुंबईतही होते. या परिचितांनी विश्वस्तांना माझ्या वडिलांचे नाव सुचवले. त्यांनी माझ्या वडिलांसमोर महिना साडेसहाशे रुपये पगाराचा प्रस्ताव ठेवला. ही रक्कम फारच कमी होती; पण विश्वस्तांचं म्हणणं होतं, की आम्ही तुम्हाला राहायला खोलीसुद्धा देत आहोत. माझ्या वडिलांचा आजार असा होता, की त्यांना कशात तरी गुंतवून ठेवणं गरजेचं होतं. आई-वडील दोघांनाही नव्याने आयुष्य सुरू करायचं होतं. त्यांच्यापाशी बचतीचाही आधार नव्हता; कारण वडिलांच्या गोंदियातील पगारात आमचा तिघांचा उदरनिर्वाह मोठ्या मुश्किलीने कसातरी भागत होता.

३ डिसेंबर, १९८८ला ते दोघे महाबळेश्वरला आले. आर. के. वाडीमध्ये १७ बंगले होते. हे स्थान १९४२ साली साकारलं होतं. त्याच परिसरात वडिलांना १० बाय १२ ची एक खोली राहण्यासाठी देण्यात आली. त्यांच्याकडे सर्वांत महत्त्वाचे काम होते, ते म्हणजे मुंबईहून जे बुकिंग होत असे, त्यानुसार खोल्या तयार ठेवणे. त्यांच्या हाताखाली एक माळी व एक सफाई कर्मचारी होता. बंगल्यात स्वयंपाकघराची व्यवस्था असल्यामुळे, तिथे येणारे लोक पंधरा दिवस ते दोन महिन्यांपर्यंत तिथे मुक्काम करत असत. माझ्या वडिलांसाठी हे काम अगदी उत्तम होतं. काही दिवसांतच त्यांनी हे काम उत्तमरीत्या सांभाळलं.

याच दरम्यान, आईच्या वडिलांनी आमची परिस्थिती लक्षात घेऊन, आईला पैसे पाठवले. ही रक्कम चांगली मोठी होती. त्या पैशातून आईवडिलांनी महाबळेश्वरजवळच्या केशर गावात बारा एकर जमीन विकत घेतली. जमीन अत्यंत वैराण होती; पण आपला एकुलता एक मुलगा आहे, आज ना उद्या त्याला उपयोग होईल अशा विचाराने त्यांनी आजोबांकडून मिळालेले सगळे पैसे या जमीन खरेदीसाठी वापरले. आजोबांनी पाठवलेले पैसे फालतू गोष्टींवर खर्च होऊ नयेत अशी आईची इच्छा होती.

सगळी घडी नीट बसू लागली होती. वडील पुन्हा जबाबदारी सांभाळू लागले होते. मलाही महाबळेश्वर खूप आवडलं होतं. मी पाचवीत असताना, इंग्रजीच्या पुस्तकात माथेरान व महाबळेश्वर या डोंगराळ प्रदेशांचा उल्लेख होता. श्रीमंत लोक उन्हाळ्याच्या दिवसांत हवापालटासाठी महाबळेश्वरला जातात असं त्या धड्यात वाचलं होतं. ते वाचल्यावर मला वाटायचं, हे श्रीमंत लोक... आपल्या नशिबात कुठलं आलंय असं? महाबळेश्वरला येण्याचा मला खूप आनंद झाला होता.

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात अतिशय सुंदर, डोंगराळ प्रदेशात महाबळेश्वर वसलेलं आहे... मुंबईपासून ३०० किमी, पुण्याहून १२० किमी व सातारा शहरापासून ६० किमी अंतरावर, समुद्रसपाटीपासून ५००० फूट उंचीवर वसलेली महाबळेश्वरची बाजारपेठ जवळजवळ एक किलोमीटरच्या सरळ रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वसलेली आहे. पावसाळ्याचे तीन महिने सोडले, तर एरवी ही बाजारपेठ सूर्यास्तानंतर पर्यटकांनी गजबजलेली असते.

महाबळेश्वरची भौगोलिक रचना अशी आहे, की एका बाजूला छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील इतिहास सांगणारा प्रतापगड आहे, तर दुसऱ्या बाजूला पांडवांच्या वनवासादरम्यान उभारलेले ५००० वर्षांपूर्वीचे शिवमंदिर व महाबळेश्वर क्षेत्रातून उगम पावणाऱ्या कृष्णा, कोयना, वेण्णा, सावित्री व गायत्री नद्यांचे दर्शन होते. हिरवीगार जंगले व खळखळणाऱ्या झऱ्यांनी नटलेला हा संपूर्ण प्रदेश शतकानुशतके पर्यटकांना आकर्षित करत आला आहे. इतक्या विलोभनीय स्थळी राहण्याची मला संधी मिळत होती, त्यामुळे अगदी खुशीत होतो; पण परिस्थिती नेहमी तशीच कुठे राहते? संकटे माझी पाठ सोडायला तयार नव्हती.

मी एम.ए.च्या पहिल्या वर्षात असताना माझ्या आईला रक्ताचा कर्करोग झाल्याचं समजलं. आयुष्यभर मला आणि वडिलांना सांभाळणाऱ्या माझ्या आईने स्वत:ला कधी वेळच दिला नव्हता. माझं अंधत्व आणि वडिलांचा स्किझोफ्रेनियाचा आजार... या सगळ्यात तिच्यावर कामाचा प्रचंड भार पडत होता. वडिलांना त्यांच्या आजारपणामुळे खूपदा रात्री 'ॲटॅक' येत असे. ते

मध्यरात्री उठून बाहेर जायचे. कुणीतरी येऊन आपल्याला ठार मारेल अशी त्यांना भीती वाटत असे. ही भीती त्यांना नेहमी घेरून असायची. त्यांना झोपेच्या गोळ्या दिल्या जायच्या, त्यामुळे ते दिवसभर झोपून असत. त्यामुळे त्यांचं ऑफिसचं कामसुद्धा आईलाच पाहावं लागायचं.

मग आईवर मुंबईच्या टाटा हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू केले. हे कर्करोगावरील उपचारांसाठी प्रसिद्ध हॉस्पिटल आहे. आईला जो कर्करोग झाला होता त्याचं नाव होतं 'नॉन हॉजकिंस लिंफोमा' - आपलं रक्त जिथून तयार होतं, त्या ग्रंथी काम करेनाशा झाल्या होत्या.

मी आईला महाबळेश्वरहून बसने मुंबईला घेऊन जायचो. तिथे पहाटे ४ वाजता एल्फिन्स्टन परेलला उतरून आम्ही टाटा हॉस्पिटलमध्ये जायचो. आम्ही तिथं सकाळी खूप लवकर पोहोचायचो, त्यामुळे मी सिक्युरिटीला सांगून आईला आत लॉबीत न्यायचो. रात्रभर बसचा प्रवास करून ती खूप थकून गेलेली असायची. मग तिथली बाके एकमेकांना जोडून मी तिला आराम करायला लावायचो आणि आम्ही नऊ वाजण्याची वाट बघायचो.

हॉस्पिटलच्या समोर चहा-नाश्ता करून, त्यानंतर डॉक्टरांना भेटायचो. टाटा हॉस्पिटलमधील व्यवस्थेनुसार तुमची फाइल कोणत्या प्रकारची आहे या गोष्टीचं खूप महत्त्व असे – म्हणजे जनरल, का प्रायव्हेट. त्याचा अर्थ सरळ होता – गर्दी जास्त का कमी... तुम्हाला कुठे उपचार करून घ्यायचे आहेत?

मग तुमच्या फाइलच्या हिशोबाने उपचारांचा खर्च ठरत असे. मला वाटत होतं, की कर्करोग फार थोड्या लोकांना होतो; पण मी टाटा हॉस्पिटलमध्ये ४ वर्षांपासून ते ८० वर्षांपर्यंतच्या रुग्णांची गर्दी पाहिली. कुणी पटनाहून आलेले तर कुणी कोलकात्याहून. आपल्याला वाटतं, की माणूस मेल्यावर तो स्वर्गात किंवा नरकात जातो; पण जर कुणाला मरण्याआधी... याच जन्मात नरक म्हणजे काय हे पाहायचं असेल, तर त्याने ते टाटा हॉस्पिटलमध्ये जाऊन पाहावं. तिथे डॉक्टर्स कमी आणि रुग्ण जास्त असतात. आपला नंबर येईपर्यंत दोन-तीन तास वाट पाहायची... मग नंबर यायचा. त्यानंतर डॉक्टर तपासायचे. मग रक्त-तपासणीसाठी रक्ताचा नमुना द्यायचो. त्यामध्ये जर पांढऱ्या पेशी १०,०००च्या पुढे असल्याचं

कळलं, तर आईला 'डे केअर'मध्ये दाखल करून किमोथेरपी दिली जायची. हे सगळं पार पडल्यावर, मी पुन्हा रात्रीच्या बसने आईला घेऊन महाबळेश्वरला परत यायचो. रात्रीच्या वेळी हवेत गारवा असायचा, त्यामुळे तिला बरं वाटायचं. मग दुसऱ्या दिवशी तिला विश्रांती घेता यायची. किमोनंतर शरीरातील कर्करोगाबरोबरच पांढऱ्या रक्तपेशीही मोठ्या प्रमाणात जळून जातात. त्यांची संख्या ५०० ते ७०० पर्यंत येते. त्यामुळे जवळपास कुणी व्यक्ती शिंकली, तरी त्यामुळे संसर्ग होऊ शकतो. 'किमो'नंतर या गोष्टीची खूप काळजी घ्यावी लागत असे. मी लहान असतानाच आईने मला स्वयंपाक करायला शिकवलं होतं, त्याचा आता उपयोग झाला. मी तिला कोबी, पालक या भाज्या, गाजराचा रस वगैरे करून द्यायचो... तिच्या पांढऱ्या पेशी लवकरात लवकर वाढाव्यात म्हणून.

मग एक-दीड महिन्याने मी तिला पुन्हा 'किमो' देण्यासाठी टाटा हॉस्पिटलमध्ये न्यायचो. आम्ही बसमध्ये बसताना देवाला प्रार्थना करायचो की, तिच्या पांढऱ्या पेशींचा काउन्ट व्यवस्थित असू दे, म्हणजे आमची खेप फुकट जाणार नाही.

मला आठवतंय, हॉस्पिटलच्या बाहेर बऱ्याच हातगाड्या असत, तिथे पाच रुपयांत एका छोट्या बशीत दालचावल मिळायचं. आम्हाला ते खाणं भाग असायचं; कारण उपचारांदरम्यान आमच्याकडे पैसे नसायचे. टाटा हॉस्पिटलमधल्या त्या एक-दीड वर्षातील फेऱ्यांदरम्यान मला गरिबी आणि संकटांची झळ काय असते ते चांगलं समजलं!

पहिल्या सहा 'किमो'नंतर काही महिने आई बरी होती; पण त्यानंतर तिची तब्येत पुन्हा बिघडल्यावर डॉक्टरांनी पुढील ३५ किमो व त्यासाठीचा खर्च लिहून दिला. पहिल्या सहा 'किमो' चाळीस हजार रुपयांत पूर्ण झाल्या होत्या. एवढी रक्कम आम्ही अगदी सहज उभी केली होती.

डॉक्टरांनी पुढच्या इलाजाच्या खर्चाचे तपशील असलेला जो कागद दिला होता, तो मी तिथे बसलेल्या एका वार्डबॉयकडून वाचून घेतला. त्याने सांगितलं, की ४९५० रुपयांना एक इंजेक्शन आहे. ते ऐकल्यावर मला वाटलं की, अजून दीड ते दोन लाख रुपये लागतील; पण तेही आपण जमवू.

हॉस्पिटलमधील रोजचे रुक्ष व्यवहार टाळण्यासाठी, तिथेच अकाउन्ट

उघडून आम्हाला एक कार्ड दिलं होतं, त्यात मी १५-१७ हजार रुपये जमा केले होते. आज इतक्या वर्षांनीसुद्धा तो कार्डनंबर माझ्या लक्षात आहे. बी. आर. १८६९३. रुग्णाच्या फाइलचा नंबरही हाच असे. हॉस्पिटलमध्ये कुठेही हे कार्ड 'पंच' केले की कॉम्प्युटरच्या स्क्रीनवर पैशांच्या तपशिलांसह रुग्णाचीही संपूर्ण माहिती येत असे. त्या दिवशी मी हॉस्पिटलमधील औषधांच्या दुकानात ते इंजेक्शन आणायला गेलो असता, त्यांनी कार्ड 'पंच' केल्यावर सांगितले, की तुमच्या खात्यात पैसे कमी असल्यामुळे तुम्हाला इंजेक्शन देता येणार नाही. मी त्यांना म्हणालो, ४९५० रुपयांना एक इंजेक्शन या हिशोबाने तेवढ्या पैशात तीन इंजेक्शने येतील, तरी तुम्ही खात्यात पुरेसे पैसे नाहीत असं कसं म्हणताय?

मग मला त्या दुकानाच्या खिडकीच्या आत उभ्या असलेल्या माणसाने सांगितलं, की ते इंजेक्शन ४९५० रुपयांना नाही, तर ४९,५०० रुपयांना आहे. हे ऐकल्यावर माझ्या पायाखालची जमीनच सरकली. तेव्हा माझ्या लक्षात आलं की तो वॉर्डबॉय त्या रकमेतलं एक शून्य विसरला होता.

एक इंजेक्शन इतके महाग, तर ३५ इंजेक्शनचे पैसे कसे उभे करायचे? आणि फक्त ३५ इंजेक्शनचाच खर्च नव्हता. महाबळेश्वरहून मुंबईला जाणे-येणे, रक्त तपासणे, हॉस्पिटलच्या डे-केअरचे भाडे आणि त्याचबरोबर महागडी महागडी औषधे... इतके पैसे कुठून आणायचे? मग मी आजोळी फोन केला आणि त्या दिवशीच्या इंजेक्शनसाठी जेवढे पैसे कमी पडत होते, तेवढे पैसे पाठवायला मामाला सांगितलं. त्यानुसार आईचा चुलतभाऊ टॅक्सी करून शक्य तितक्या लवकर पैसे घेऊन आला आणि त्या दिवशीच्या 'किमो'ची व्यवस्था झाली; पण जेव्हा दुसऱ्यांदा इंजेक्शन घ्यायची वेळ आली, तेव्हा मित्र किंवा नातेवाईक कसे असतात ते चांगलंच कळलं! त्यांच्यापैकी बहुतेकजण काही ना काही सबब सांगून सुटका करून घेऊ इच्छित होते. त्यांच्यापैकी ज्या लोकांना मी त्यांच्याकडे पैसे उसने मागणार असं वाटायचं, ते लगेच सांगायचे, ''अरे, जाऊ दे ना, आपण पंतप्रधानांना पत्र लिहू, मंत्र्यांना पत्र लिहू.'' कुणी म्हणायचं, ''शिर्डीच्या ट्रस्टकडे जाऊ.'' प्रत्येकजण अंग काढून घ्यायला बघत होता. त्यांची खोटी आश्वासने व सबबी ऐकून मला फार वाईट वाटत होतं.

अखेर मी वडिलांना सारं काही सांगून टाकलं. पहिल्या सहा 'किमो'

होईपर्यंत, मी त्यांना आईला कर्करोग झाल्याचंसुद्धा सांगितलं नव्हतं; कारण त्यांची तब्येत पुन्हा बिघडली तर त्यांना कसं सांभाळायचं हा माझ्यासमोर प्रश्न होता. आधीच ते मानसिकदृष्ट्या अतिशय त्रासलेले होते, त्यात त्यांना आईचा आजार व आर्थिक समस्येबद्दल सांगून मी त्यांना आणखी त्रास देऊ इच्छित नव्हतो; पण माझ्यासमोर दुसरा काही पर्यायच उरला नव्हता.

मग मी त्यांना सगळी परिस्थिती सविस्तर सांगितली आणि यातून काहीतरी मार्ग काढा असं सांगितलं. त्यांनी ट्रस्टीकडे चाचपणी करून पाहिली; पण ट्रस्टनेही पैसे देण्यास नकार दिला. अखेर मी व वडिलांनी निर्णय घेतला, की त्यांनी जी जमीन विकत घेतली होती ती विकू या. मग आम्ही जमीन अक्षरशः कवडीमोलाने विकली आणि एक लाख रुपये प्रतिएकर या भावाने त्या जमिनीचे बारा लाख रुपये ताबडतोब उभे केले. त्या वेळी आईला वाचवणे हे आमचे सर्वोच्च प्राधान्य होते. मी तर त्या वेळी माझी किडनी विकायलासुद्धा तयार होतो. मग जमीन विकून आलेल्या पैशांतून आणखी काही 'किमो' झाल्या. किमोच्या नुसत्या इंजेक्शनला ५० हजार रुपये लागत असत, त्या जोडीने जाण्यायेण्याचा खर्च, खाण्यापिण्याचा खर्च हे सगळं मिळून एका 'किमो'साठी जवळजवळ ६० ते ६५ हजार रुपये लागत असत.

कुणीतरी दिलेल्या सल्ल्यानुसार मी दक्षिण मुंबईतील काळा घोडा परिसराजवळ असलेल्या बॉम्बे डाइंग ट्रस्टच्या कार्यालयात इंजेक्शन्सच्या खर्चासाठी आर्थिक साहाय्य मागण्यासाठी गेलो. त्या वेळी माझी मनोवस्था अशी होती, की मी एकेका इंजेक्शनची व्यवस्था करण्यासाठी आकाशपाताळ एक करायला तयार होतो. बॉम्बे डाइंग ट्रस्टला जी जी कागदपत्रे हवी होती, म्हणजे वार्षिक उत्पन्न, टाटा हॉस्पिटलच्या खर्चाचे तपशील, समाजसेवकाचे शिफारसपत्र, ती सगळी माझ्याकडे होती. मग मी ती सगळी कागदपत्रे घेऊन त्यांच्या ऑफिसमध्ये गेलो. फाइल खूपच मोठी झाल्यामुळे, मी काही कागदपत्रे त्यात लावू शकलो नव्हतो; पण माझी ही चूक समोर बसलेल्या ट्रस्टी महोदयांना बहुधा सहन झाली नाही. त्यांनी ती फाइल माझ्या तोंडावर फेकली आणि 'तुला फाइलमध्ये कागद कसे लावायचे एवढंही समजत नाही?' ते माझ्यावर खेकसू लागले.

फाइलमधले कागद त्यांच्या केबिनभर पसरले. मग मी खाली वाकून,

हातांनी चाचपडत ते कागद गोळा करण्याचा निष्फळ प्रयत्न करू लागलो. बहुधा त्या वेळी त्यांच्या लक्षात आलं, की मला दिसत नाही. मग ते उठले आणि माझ्यासोबत ते कागद गोळा करू लागले. बहुधा त्यांचं मन त्यांना खात असावं. मग ते माझ्या खांद्यावर हात ठेवत म्हणाले, ''दिकरा, बाँधी ने लइ आवानु, आम केम चालें.''

त्यानंतर त्यांनी पुन्हा माझी फाइल उघडून पाहिली व सांगितलं, की आम्ही हॉस्पिटलमध्ये तुमच्या खात्यात एका इंजेक्शनचे पैसे जमा करू.

माझ्या डोळ्यांत पाणी आलं... दु:खाने की आनंदाने... कोण जाणे? मी तिथून पुन्हा हॉस्पिटलमध्ये आलो. दुसऱ्याच दिवशी हॉस्पिटलमधल्या खात्यावर एका इंजेक्शनचे पैसे जमा झाले. कुणीतरी साईबाबा मंदिर ट्रस्टकडून मदत मिळवून दिली, तिथूनही एका इंजेक्शनचे पैसे आले. असं करत करत २२-२३ किमोथेरपी पूर्ण झाल्या. अजून १२-१३ इंजेक्शन बाकी होती. त्याच दरम्यान, माझा एक मित्र मला मुंबईत अंधेरीमधील जर्मन रेमिडीज कंपनीच्या ऑफिसमध्ये घेऊन गेला. ही कंपनी आईला लागणाऱ्या त्या इंजेक्शनची वितरक होती. माझी अवस्था पाहून त्या कंपनीच्या अधिकाऱ्याने मला ३० हजार रुपयांत ते इंजेक्शन द्यायची तयारी दाखवली. तो म्हणाला, ''मला यात एक रुपयाही नफा मिळवायचा नाहीये.''

त्यामुळे, मला उर्वरित इंजेक्शन्स, जवळजवळ १३ इंजेक्शन्स ३० हजार रुपयांना एक याप्रमाणे मिळाली. आता प्रत्येक किमो ६५ हजार रुपयांऐवजी साधारण ५० हजार रुपयांत पूर्ण होऊ लागली होती. तरीही अजून माझ्या डोक्यावर मित्र व नातेवाइकांचं लाखो रुपयांचं कर्ज होतं; पण आईच्या पस्तीसच्या पस्तीस... सगळ्या किमो विनाव्यत्यय पूर्ण झाल्याचा मला आनंद होता.

दर पंधरा दिवसांनी 'किमो' असायची. त्यानंतर ३-३ किमो एकाच वेळी दिल्या जाऊ लागल्या. आईची तब्येत दिवसेंदिवस बिघडत चालली होती. तिनं खाणं सोडलं होतं. मी तिला बाहेर उन्हात बसवायचो, तिच्याशी गप्पा मारायचो, तिला गाजराचा रस पाजायचो. ती बरी व्हावी यासाठी सगळे प्रयत्न करायचो. तिच्यावर जवळजवळ दीड वर्षे उपचार सुरू होते. डॉ. रीना नायर तिच्यावर उपचार करत होत्या. आम्ही आईला टाटा हॉस्पिटलमध्ये

पहिल्यांदा घेऊन गेलो होतो, तेव्हाच डॉक्टरांनी 'थर्ड-स्टेज' पार झाली असल्याचं आणि जास्तीत जास्त सहा ते आठ महिने... असं सांगितलं होतं; पण लोकांची आत्मीयता आणि आईने तिच्या बालपणीच्या मैत्रिणींसह ज्यांच्याज्यांच्याशी संबंध जोडले होते, ते सगळे आलटून-पालटून महाबळेश्वरला तिला भेटायला येत होते, त्यामुळे तिला खूप बरं वाटायचं. त्या आपलेपणाच्या वातावरणात ती आनंदी असायची, त्यामुळे तिने या आजाराच्या यातना सोसत जवळजवळ तीन-साडेतीन वर्षे काढली; पण मी या काळात तिला कधीही दु:खी अवस्थेत पाहिलं नाही. उलट, प्रत्येक वेळी तीच मला धीर देत असायची. मला खूप त्रास होतोय हे तिला कळत होतं. पैशाची अडचण असो, की तिला मुंबईला हॉस्पिटलमध्ये घेऊन जाणे असो या सगळ्यांत माझी खूप धावपळ होत आहे असं तिला वाटायचं. बहुधा त्यामुळेच ती तिच्या यातना माझ्यापासून लपवण्याचा प्रयत्न करत असावी. तिला किमोथेरपीसाठी हॉस्पिटलच्या डे केअरमध्ये दाखल केलेलं असायचं, तेव्हा आजूबाजूच्या रुग्णांच्या किंकाळ्या माझ्या कानावर पडायच्या; पण आई अतिशय शांतपणे किमोथेरपीच्या वेदना सहन करायची. मी तिला गाजराचा रस पाजायचो किंवा कधी कोबीची भाजी करायचो, तेव्हा ती ते अतिशय आवडीने खायची.

२० फेब्रुवारी, १९९४ पहाटे साडेपाच वाजता आईने मला मोठ्याने हाक मारली. मी धावतच तिच्यापाशी गेलो; पण शेवटची घटका आली होती...

तिने माझा हात घट्ट धरला आणि तिचे प्राण गेले... माझ्या दृष्टीने युगाचा अंत झाला. मी एकटा पडलो होतो. परमेश्वराने मला दृष्टी दिली नव्हती; पण माझी आई होती... तीच माझे सर्वस्व होती. तिच्यामुळे मला दृष्टी नसल्याचं इतकं दु:ख कधी झालं नव्हतं; पण जेव्हा ती मला सोडून गेली, तेव्हा मला मी खऱ्या अर्थाने दृष्टिहीन झाल्यासारखं वाटलं!

साक्षी

एस.एल.भैरप्पा, एक अतिशय लोकप्रिय कन्नड कादंबरीकार. उमा कुलकर्णी यांनी अनुवादित केलेल्या त्यांच्या काही मराठी कादंबऱ्या 'अंचू', 'पर्व', 'अवेषण', 'आवरण', 'सार्थ', 'वंशवृक्ष' या आणि बऱ्याच ज्या कन्नड इतक्याच मराठीमध्येसुद्धा खूप प्रसिद्धीस आल्या. त्यांच्या अशाच साहित्यापैकी एक गाजलेलं आणि अतिशय उत्कृष्ट साहित्य म्हणजे त्यांची कादंबरी 'साक्षी.' साक्षीचा अर्थ खरं बोलणं; परंतु आज समाजात वावरत असताना एखाद्या साक्षीदाराकडून बोललं जाणारं खरं हे ते ज्या व्यक्तीसाठी बोललं जातं त्या व्यक्तीला त्याचा फायदा व्हावा अशाच प्रकारचं असतं. अगदी 'देवाशपथ खरं बोलेन' असं म्हणून दिल्या गेलेल्या साक्षी या बऱ्याच वेळा खोट्याच असतात; परंतु तत्त्वज्ञानानुसार बोलायचं झालं तर 'साक्षी' म्हणजे आपला अंतरात्मा आहे. ज्याचा संबंध मानवाच्या ज्ञानेंद्रिय आणि कर्मेंद्रियाशी आहे, तसेच शरीरात असणाऱ्या आपल्या मन, बुद्धी

आणि आत्म्याशी आहे. जेव्हा साक्षीच्या त्या स्तरापर्यंत एखादी व्यक्ती पोहोचते तेव्हा ती खोटं बोलूच शकत नाही; परंतु प्रत्येक व्यक्ती त्या स्तरापर्यंत पोहचू शकत नसल्याने बऱ्याच वेळा त्यांचा आपल्या अंतरात्म्याशी संघर्ष चालू होतो. हाच मानवी मनाचा संघर्ष आणि भाव-भावना डोळ्यांसमोर ठेवून लिहिली गेलेली तत्त्वज्ञानावर आधारित अशी ही कादंबरी 'साक्षी.'

– संदीप प्रकाश जाधव

भुताचा जन्म

दिवसा ती काहीही करत नसली, तरी रात्रीच्या वेळी त्यांना उजाडते. त्यांचे पाय उलटे असतात म्हणे अशी भुतांच्या बाबतीत आपल्या मनाची समजूत आहे आणि नेमका त्याचा ठाव घेत द. मा. मिरासदार यांनी 'भुताचा जन्म' हे पुस्तक लिहिलं आहे. विनोदी धाटणीतील मेहता पब्लिशिंग हाऊसचे हे १२६ पानांचे पुस्तक वाचताना आपण प्रत्यक्ष ते प्रसंग अनुभवत आहोत असे वाटते. 'भुताचा जन्म' हा कथासंग्रह आपल्याला गावात घडलेल्या काही घटनांची आठवण करून देतो. त्यांनी वापरलेली गावरान भाषा वाचकाला खिळवून ठेवते. प्रत्येक कथेतून एक वेगळं व्यक्तिचित्रण अभ्यासायला मिळतं. संवादातून काढलेले विनोदी चिमटे एकटेपणातही खो खो हसायला लावतात. गंमत म्हणजे आपण इतके हसतो की समोरची व्यक्ती आपल्याला नक्कीच विचारते की इतकं हसण्यासारखं काय आहे? आणि आपण पूर्ण कथा सांगत सुटतो. हा लेखकाच्या लेखनशैलीचा विजय आहे. गावातील चालीरीती, परंपरा, पोशाख आणि भाकडकथा यांचं संमिश्र स्वरूप म्हणजे 'भुताचा जन्म.' नाव जरी असे असले तरी प्रत्यक्ष भुताची एकच कथा आहे आणि बाकीच्या कथा या त्या कथेतील ठरावीक पात्राच्या वागणुकीला 'भूत' म्हणून नोंदवतात असे मला वाटते. भुताचा जन्म कसा झाला यावरचा शोध, 'भवानीचा पक्षकार' मधील मेहनती

वकील, 'नाना', भीमू बुरुडचा कोंबड्या विकण्याचा पराक्रम, नदीकाठी बाईच्या प्रेतावर झालेला काथ्याकूट, मारुतीचा कंटाळा, तात्याने विंचवाच्या मदतीने शिकलेली पंचाक्षरी, मैनाबाई स्वयंपाकिणीला नवऱ्याने हाल करूनही गेलेले दिवस, बाबू न्हाव्याचे 'जाऊ दे कोर्टात' सांगून पैसे कमावणे, सोळा आण्याचे वतनदार चतुर अण्णासाहेब, बंड्याच्या तपकिरीचा शाळेतला उपद्व्याप आणि महाद्याने तालुक्यावर पाठवलेला निरोप अशा अकरा कथांचा हा संग्रह वाचताना वाचकाला खिळवून ठेवतो. एका खेपेतच पूर्ण संग्रह वाचला जातो. प्रत्येक कथेत शेवटच्या परिच्छेदात धक्का तंत्र वापरले आहे. त्यामुळे एखादी कथा सोडली तर बाकी कथांचा शेवट पट्कन लक्षात येत नाही. अंदाज लावला तरीही तसा शेवट होत नाही यात लेखकाचा वाचनाचा दांडगा अनुभव जाणवतो. संवादात वापरलेल्या गावाकडील भाषेमुळे कथा आपलीशी वाटते. दीर्घकाळ धाटणीतल्या लघुकथांचा बाज राखूनही विनोदाची फोडणी जबरदस्त आहे. विनोदी संस्कृतीची जपणूक करणारा हा कथासंग्रह प्रत्येकाच्या संग्रही नक्कीच असायला हवा... कारण मिरासदारांनी विनोदाचे बाळकडू इतरांपेक्षा जरा जास्तच प्यायलेले वाटते!

– मानसी सरोज

अर्धदशक

नुकतेच मी अर्ध दशक वाचून पूर्ण केले. खूप सुंदर. विषय अगदी ओघवत्या पद्धतीने मांडला आहे. वाचताना पुढे काय ही उत्सुकता कायम ठेवण्यात लेखक यशस्वी झालाय. विविध पात्रांची बोलीभाषा वेगळी असल्याने ती व्यक्तिमत्त्वं डोळ्यांसमोर उभी राहतात. विशेषतः, कोल्हापुरी असं काय करायलंय? किंवा खानदेशी काय भौ? हे... तसंच सगळी कादंबरी पुण्यात घडते. त्यामुळे तिथली स्थानं, गल्ली- बोळ, पुणेरी भाषा, पुणेरी पाट्या... अक्षरशः साक्षात पुणं डोळ्यांसमोर येतं.

बोलीभाषेतल्या म्हणी, रोजच्या जीवनातील उदाहरणं यामुळे आपण कादंबरी वाचत नसून त्या सर्वांचा भाग असल्याची अनुभूती मिळते. खरोखर, मिलिंद त्याच्या या प्रयत्नात अतिशय यशस्वी झाला आहे. त्याचं अभिनंदन करावं तेवढं कमी आहे. एक संवेदनशील लेखक म्हणून माझा त्याला एक खणखणीत सलाम !! त्याच्या पुढच्या प्रत्येक लिखाण आणि प्रयत्नांना लाख लाख शुभेच्छा!!! शुभाशीर्वाद... !!

– देवदत्त साबळे, संगीतकार

हिज डे

ही कादंबरी मती सुन्न करते, तसेच या लोकांबाबत सहानुभूतीने विचार करण्यास प्रवृत्त करते. 'हिज डे' कादंबरी ही ट्रान्स जेंडर, त्यांच्या वेदना, क्लेश, समस्या यावर आधारित असून, ती सत्य आणि काल्पनिक यांची गुंफण. नक्की वाचा मन सुन्न करणारी आणि वाचनात एक नवीन भर टाकणारी कादंबरी.

– सुहास जाधव

टाईमपास

नेहमीच्या सरधोपट आयुष्यात आपण कल्पनाही करू शकणार नाही असं एक वेगळं खळबळजनक आयुष्य प्रोतिमा बेदी सत्तर-ऐंशीच्या दशकात जगली. कबीर बेदीची (एके काळची) बायको, पूजाची आई आणि गोवा बीचवरती पळताना न्यूड फोटो काढलेली बाई इतपतच हिची आधी माहिती होती; पण यापलीकडेही अफाट, बेभान आणि मनस्वी वागणारी ही बाई होती. जेव्हा जे करावं वाटेल ते केलं. कपडे बदलल्यासारखे प्रियकर

बदलले. (वाचताना नंतर नंतर मी नावं लक्षात ठेवायचं आणि एकूण आकडा मोजायचं सोडून दिलं.) त्या काळातले काँग्रेसचे मोठे नेते रजनी पटेल (अमिषाचे आजोबा), पं.जसराजांपासून ते तेव्हाच्या एका रसिक नभोवाणी मंत्र्यांपर्यंत तिचे 'संबंध' होते, चांगली वट होती. या नागपुरी मंत्र्यांचं पुस्तकात नाव 'मनू' असलं तरी ते सहज ओळखू येतात. तिचा शब्द झेलायला हे लोक सदैव तयार असायचे. रजनी पटेलांनी तर तिला एकदा 'मुंबईची मेयर होणार का?' विचारलं होतं. ती 'हो' म्हणाली असती तर झालीही असती. तिला या सगळ्या राजकीय गोष्टींच्यात काही रस नव्हता; पण आपल्यासारख्या नगण्य स्त्रीला ते मेयर बनवू शकतात तर बऱ्याचशा पदावर बसलेली माणसं कशी बसली असावीत हे लक्षात येतं, असं तिने लिहिलंय. दुर्दैवाने आजही ते तितकंच खरं आहे. घडलेल्या घटना अतिशय प्रामाणिकपणे लिहिल्याचं जाणवतं. वरून कठोर दिसणारी आणि आतून हळवी असणारी ही बंडखोर बाई आपल्या टर्म्सवरती जगली, समाजाच्या नैतिकतेच्या कल्पनांना सुरुंग लावला. त्याचे परिणामही हिमतीने स्वीकारले. तिच्या लिखाणाला वेगवेगळे कंगोरे आहेत. लहानपणीच्या कटू आठवणी, लैंगिक अत्याचार, मॉडेलिंगचे अनुभव, आपण मनाला येईल तसं वागलो... मुलांना पुरेसा वेळ दिला नाही याची बोचरी जाणीव, आई म्हणून मुलांसाठी तीळतीळ तुटणं, एक बायको म्हणून वेळेला पझेसिव्ह होणं, नवऱ्याच्या अफेअर्समुळे काळजीत असणं, त्याला आणि त्याच्या प्रेयसींना समजून घेणं, एक प्रेमिका म्हणून जिवाच्या आकांताने तडफडणं, एक भक्त म्हणून आलेले देवीच्या चमत्काराचे समाधानी अनुभव, गुरूंच्या, शिष्यांच्या आठवणी आहेत. घडलेल्या घटनांचा धांडोळा घेताना चुकांची कबुली, यशाचा उल्लेख आहे. तेही अगदी सहजतेने, कुठलाही आव न आणता. राजकीय नेते, त्यांची कुटुंबं आपल्यामुळे अडचणीत येऊ नयेत याची तिला जाणीव आहे. त्यासाठी तिने आणि पटेलांनी एकमेकांना लिहिलेली पत्रे (जी तिला प्रकाशित करायची होती) तिने त्यांच्या मुलाला परत केली. प्रोतिमाच्यात सतत एक प्रेमिका, अभिसारिका जाणवते. लहानपणापासून मायेला, कौतुकाला पारखी झालेली

ही मनस्वी मुलगी पुढे आयुष्यभर प्रेम शोधत राहिली. हातातून काहीतरी निसटून चाललंय आणि आत्ता या क्षणी ते पकडायलाच हवं अशा भावनेने जगण्याच्या प्रवाहात भटकत राहिली. अडखळत पावलं टाकत टाकत लहान मूल जसं फुलपाखरू पकडायचा प्रयत्न करेल.. पडेल...उठेल आणि परत चालेल अगदी तसंच तिचं आयुष्य जाणवतं. वयाच्या २६व्या वर्षी गुरू केलुचरण महापात्रांच्याकडून ओडिसी नृत्य शिकून मग यातच काही करावं या ध्यासाने ती कर्नाटकात बेंगळुरूजवळ नृत्याचं गुरूग्राम उभं करते. गरजू मुलांना नृत्य शिकण्यासाठी उपयोग व्हावा यासाठी धडपडते. नंतर योग्य व्यक्तींना ते हस्तांतरित करून त्यातून बाहेरही पडते. मुलगा सिद्धार्थच्या आत्महत्येनंतर ती ढासळते. पुढे कैलास मानस सरोवर यात्रेदरम्यान दरड कोसळून तिचं निधन होतं. पुस्तक वाचून संपल्यानंतर आपण काही काळ दिङमूढ होतो. विषण्ण व्हायला होतं. एखाद्याचं आयुष्य किती प्रवाहपतित असू शकतं असं वाटतं. दारू, ड्रग्ज, सेक्स, सोशल लाईफ, पार्ट्या हेच आयुष्य असणारी ही बाई अचानक नृत्य काय शिकते, त्यात प्रावीण्य मिळवते, संस्था उभारण्यासाठी जिवाचं रान करते. मग ऐहिक गोष्टी त्यागून आध्यात्मिक होते, 'स्व'चा अर्थ शोधायचा प्रयत्न करते. हे पुस्तक बायोपिक किंवा वेब सिरीजसाठी उत्तम आहे. सतत घडणाऱ्या घटना, नात्यांची गुंतागुंत, परदेशातील अनुभव, प्रेम, अफेअर्स असं सगळ्या प्रकारचं वैविध्य यात आहे. सुप्रिया वकील यांनी मूळ पुस्तकाचा अतिशय सुरेख अनुवाद केला आहे. एकदाही आपण अनुवाद वाचतोय याची जाणीव होत नाही.

– माधवी शहादे

द सेव्हन्थ सिक्रेट

अतिशय उत्कंठावर्धक माहिती, चित्रमय भाषा आणि वेगवान थरारक घडामोडी, हे मला या पुस्तकाचं वैशिष्ट्य वाटतं. काल्पनिक असल्या तरी सर्व घटना अगदी सत्य आहेत, आणि त्या याच पद्धतीने घडत गेल्या असाव्यात हे वाचकांच्या मनावर बिंबवण्यात लेखक कमालीचा

यशस्वी ठरला आहे. आणि यात विजय देवधर यांच्या अनुवादाचाही तितकाच महत्त्वाचा वाटा आहे. आपण परदेशी भाषांतरित पुस्तक वाचत आहोत असं शेवटपर्यंत वाटत नाही. एखादं पुस्तक वाचून, त्याची ओळख करून देण्याचा हा माझा पहिलाच प्रयत्न आहे. मी तर असेच म्हणेन की मेहता पब्लिशिंग हाऊसचं THE SEVENTH SECRET हे पुस्तक प्रत्येकाने आवर्जून वाचावे.....

– प्रशांत गाडेकर

बाजिंद



एक शिवकालीन रहस्यकथा असे आपण समजू. रायगडाच्या टकमक कड्याखाली काही गावे आहेत. कडेलोटाची शिक्षा झालेल्यांची प्रेते खोल दरीत पडतात आणि रानटी प्राण्यांचे खाद्य बनतात.त्यामुळे रानटी प्राण्यांची संख्या वाढून आता ते आजूबाजूच्या वस्तीवर हल्ला करू लागले. गावातील चार जेष्ठ नागरिक या समस्येसाठी शिवाजी महाराजांना भेटायला निघाले आहेत. या प्रवासात ते घनदाट अरण्यात रस्ता चुकतात आणि खंडेराव नावाचा तरुण त्यांना मदत करतो. प्रवासात तो त्यांना आपली विलक्षण कहाणी सांगतो. आपण बहिर्जी नाईकांच्या हेरखात्यातील प्रमुख हेर असल्याचे सांगतो. मी तुम्हाला शिवाजी महाराजांपर्यंत घेऊन जाईन असा शब्द देतो; पण त्याचे वागणे खूपच रहस्यमय असते. शिवाजी महाराजांच्या भेटीपर्यंत खूप काही घडते. कहाणीला वेगवेगळी वळणे येतात. खूपच धक्कादायक घटना, त्यामागचे राजकारण ,कारस्थान उलगडत जाते. 'बाजिंद' कोण आहे ...? शेकडो वर्षे तो जिवंत कसा ...? त्याच्याकडे अशी कोणती वस्तू आहे, जी फक्त बहिर्जी नाईकांना द्यायची आहे ....? अशा बऱ्याच प्रश्नांची उत्तरे आपल्याला शेवटी मिळतात.त्यासाठी लेखक आपल्याला शेवटच्या पानापर्यंत खेचून नेतो.

– किरण बोरकर

१६ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२१ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

खालील संचांवर १६ ते ३१ जानेवारी दरम्यान खास सवलत

१६ जानेवारी - नानी पालखीवाला यांचा जन्मदिन
'वुइ, दि नेशन', 'वुइ, दि पीपल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ६२०/- । सवलत किंमत ४२९/-

---

१६ जानेवारी - मिलिंद गाडगीळ यांचा जन्मदिन
'संधिकाल' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १९९/-

---

१७ जानेवारी - मालविका आमडेकर यांचा जन्मदिन
'कांगारू देशीच्या गोष्टी' (४ पुस्तकांचा संच) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-

---

१९ जानेवारी - अभिजित कुलकर्णी यांचा जन्मदिन
'रेड टेप' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २४९/-

---

२१ जानेवारी - डॉ. प्रतिभा राय यांचा जन्मदिन
'पूजाघर' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-

---

२१ जानेवारी - पॉल ॲलन यांचा जन्मदिन
'आयडिया मॅन' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-

---

२२ जानेवारी - आर्यन कायले यांचा जन्मदिन
'द गॉड ऑफ ॲनिमल्स' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-

२३ जानेवारी - नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

'नेताजी', 'नेताजी सुभाषचंद्र बोस' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ५९०/- । सवलत किंमत ४१९/-

---

२३ जानेवारी - प्रमिला जरग यांचा जन्मदिवस

'आदिपर्व', 'शिवपुत्र राजाराम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ६०९/-

---

२३ जानेवारी - बाळासाहेब ठाकरे यांचा जन्मदिवस

'एकवचनी भाग १ आणि २' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ५४९/-

---

२४ जानेवारी - मिचिओ काकू यांचा जन्मदिन

'अशक्य भौतिकी' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-

---

२६ जानेवारी - प्रजासत्ताक दिन

'फ्रीडम ॲट मिडनाइट', 'मोहनदास', 'परमवीर चक्र : रणांगणावरील आपले महान योद्धे', 'भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया', 'महामानव सरदार पटेल', 'नेताजी','क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'सैनिक हो, तुमच्यासाठी...', 'सत्तरीतला भारत', 'महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष', 'जालियनवाला बाग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ४५४५/- । सवलत किंमत २९७९/-

---

२६ जानेवारी - अनिता नायर यांचा जन्मदिवस

'लेडीज कूपे', 'विस्मरणातच सर्वकाही!' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ६१०/- । सवलत किंमत ३९९/-

---

२६ जानेवारी - जोनाथन कॅरोल यांचा जन्मदिन

'द घोस्ट इन लव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-

---

२८ जानेवारी - मायकेल हेस्टिंग्ज यांचा जन्मदिन

'आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६९/-

२८ जानेवारी - डॉ. अरुणा कौलगुड यांचा जन्मदिवस
'इंटरव्ह्यू टेक्निक्स आणि प्रेझन्टेशन स्किल्स', 'जगप्रसिद्ध व्हा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २७५/- । सवलत किंमत १६९/-

२८ जानेवारी - डॉ. क्रेफ्लो डॉलर यांचा जन्मदिन
'वादळातील दीपस्तंभ' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-

३० जानेवारी - पिंकी विराणी यांचा जन्मदिवस
'पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब', 'अरुणाची गोष्ट', 'डेफ हेवन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ८१५/- । सवलत किंमत ५४९/-

खालील संचांवर १ ते १५ फेब्रुवारी दरम्यान खास सवलत

१ फेब्रुवारी - सोफी लगूना यांचा जन्मदिन
'वन फुट राँग' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-

२ फेब्रुवारी - खुशवंत सिंग यांचा जन्मदिवस
'माझ्या आयुष्यात आलेल्या स्त्रिया आणि पुरुष', 'सेक्स, स्कॉच अँन्ड स्कॉलरशिप', 'द कंपनी ऑफ विमेन', 'मृत्यू ... माझ्या उंबरठ्याशी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ८७५/- । सवलत किंमत ५९९/-

३ फेब्रुवारी - दीप्ती नवल यांचा जन्मदिन
'द मॅड तिबेटियन : गोष्टी तेव्हाच्या आणि आत्ताच्या!' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-

४ फेब्रुवारी - डॉ. गौरी बोरकर यांचा जन्मदिवस
'गर्भसंस्कार', 'स्थूलतेला करा टाटा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-

४ फेब्रुवारी - फेसबुक डे

'द फेसबुक इफेक्ट' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-

५ फेब्रुवारी - गिरिजा कीर यांचा जन्मदिवस

'आकाशवेध', 'जन्मठेप' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १४९/-

८ फेब्रुवारी - जॉन ग्रिशॅम यांचा जन्मदिवस

'अ टाइम टु किल', 'द असोशिएट', 'द चेम्बर', 'द क्लायंट', 'द फर्म', 'द पेलिकन ब्रीफ', 'द रेनमेकर', 'द पाटर्नर', 'द रनअवे ज्यूरी', 'द लास्ट ज्यूरर', 'द टेस्टामेंट', 'द स्ट्रीट लॉयर', 'द ब्रोकर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ५३९०/- । सवलत किंमत २७४९/-

८ फेब्रुवारी - अब्दुल्ला खान यांचा जन्मदिन

'पटना ब्लूज्' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २४९/-

१० फेब्रुवारी - राधिका टिपरे यांचा जन्मदिन

'वेरूळ लेण्यांतील शिल्पवैभव' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत २०९/-

११ फेब्रुवारी - स्टिफन सी. लन्डिन यांचा जन्मदिवस

'फिश!', 'फिश! फॉर लाइफ', 'फिश! स्टीक्स', 'फिश! टेल्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ६७०/- । सवलत किंमत ४४९/-

११ फेब्रुवारी - सिडने शेल्डन यांचा जन्मदिन

'चेसिंग टुमॉरो' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१९/-

१२ फेब्रुवारी - दयानंद सरस्वती यांचा जन्मदिन

'महर्षी दयानंद सरस्वती' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ९५/- । सवलत किंमत ५९/-

१२ फेब्रुवारी - वैदेही यांचा जन्मदिन

'अशीच काही पानं...' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १३०/- । सवलत किंमत ८९/-

१२ फेब्रुवारी - राजेंद्र आकलेकर यांचा जन्मदिन

'कहाणी पहिल्या आगीनगाडीची' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-

१३ फेब्रुवारी - कोडी मॅकफॅदियेन यांचा जन्मदिन

'शॅडो मॅन', 'द डार्कर साइड', 'द फेस ऑफ डेथ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १४८०/- । सवलत किंमत ९९९/-

१४ फेब्रुवारी - व्हॅलेंटाइन डे

संच १-'चिकन सूप फॉर द कपल्स सोल' 'दॅट थिंग कॉल्ड लव्ह', 'एक अनादि अनंत प्रेमकहाणी', 'प्रेमाची परिभाषा', 'अनादि-अनंत', 'अद्वैत', 'आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद', 'चिकन सूप फॉर द सोल टु लव्ह भाग –१ आणि भाग २' 'पीस, लव्ह ॲन्ड हीलिंग', 'प्रेमकथा', 'द प्राइस ऑफ लव्ह', 'अन्कंडिशनल लव्ह', 'देवदास' या पुस्तकावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ३६२०/- । सवलत किंमत २४४९/-

संच २ -'फिफ्टी शेड्स डार्कर', 'फिफ्टी शेड्स फ्रीड', 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत २१००/- । सवलत किंमत १३९९/-

❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖

अधिक माहितीसाठी संपर्क : फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

website : www.mehtapublishinghouse.com

आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.

author@mehtapublishinghouse.com

ऐश्वर्या रायनं तिच्या मिस वर्ल्ड स्पर्धेच्या प्रश्नाला उत्तर देताना म्हटलं होतं की मी हे जग सोडून जाताना माझे डोळे देऊन जाईन, म्हणजे कुणीतरी हे सुंदर जग पुन्हा पाहू शकेल..ऐश्वर्याचे हे उद्‌गार अर्थात प्रेरक आहेत... पण या जगात अशीही माणसं आहेत, ज्यांना जग अनुभवायला डोळ्यांची गरजच राहत नाही. किंबहुना ते स्वतः एक विश्व उभं करतात आणि आपण विस्फारलेल्या डोळ्यांनी अवाक् होऊन त्यांचं काम पाहत राहतो...असंच एक व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. भावेश भाटिया.. काही पुस्तकं वाचनाच्या अनुभूतीपेक्षाही फार काही देऊन जातात. डॉ. भावेश भाटिया यांचं पुस्तक म्हणजे जणू उदंड प्रेरणेचा स्रोत. दृष्टिहीन असूनही डॉ. भाटिया यांनी उभं केलेलं साम्राज्य आपल्याला अचंबित करतं. त्यांच्या या आभाळ स्पर्शणाऱ्या कामगिरीचा लेखाजोखा 'रुक जाना नहीं...' पुस्तकात येतो. या पुस्तकाचा मराठी अनुवाद प्रकाशित करण्याची संधी मेहता पब्लिशिंग हाऊसला लाभली, हे आम्ही आमचं भाग्य समजतो. महाबळेश्वरला छोटेखानी कार्यक्रमात या पुस्तकाचं प्रकाशन झालं.

डॉ. भावेश भाटियांची ही जीवनगाथा आपणा सर्वांना अखंड प्रेरणा देत राहील.



'रुक जाना नहीं...'

लेखक : डॉ.भावेश भाटिया

Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
No. CSO/Pune City/SR/3/2021 - Date : 10/01/2021
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 09/01/2021 Posting Date : 11/01/2021

नवीन संहिता... नवा आशय...





मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, _____

_____

_____

_____